पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १६ • अंक २४ • गुरुवार, दि.३० जुलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

"लोभ कधीच श्रीमंत बनवत नाही, समाधानच खरी श्रीमंती आहे."

सिटी न्यूज सुपरफास्ट
पातुर शहरात अंक मिळण्यासाठी व जाहिराती साठी
संपर्क
प्रदीप काळपांडे
तालुका प्रतिनिधी
+91 9423259577

## »थोडक्यात

### बस चालकाच्या घरी २८ कोटी

कोलकाता : पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यात पोलिसांनी एका मोठ्या छाप्यात २८ कोटींहून अधिक रोख रक्कम आणि १५ किलो सोने जप्त केले आहे. सोन्याची किंमत सुमारे २१ कोटी अंदाजित करण्यात आली आहे. अशा प्रकारे एकूण जप्ती सुमारे ४९ कोटींची आहे. नोटांचा ढिगारा इतका मोठा होता की, ते मोजताना ५ चलन मोजणी यंत्रे (करन्सी काउंटिंग मशीन्स) खराब झाली. पोलिसांनी आरोपी मिनार मंडलला अटक केली आहे. तो आधी बस चालक होता. नंतर तो दगड व्यवसायात (स्टोन कारोबार) सामील झाला. पोलिसांनुसार, तो दगड व्यावसायिक तुलु मंडलचा नातेवाईक आहे. तुलु मंडल तीच व्यक्ती आहे, ज्याने २०२४ मध्ये आपल्या मुलीचे सुमारे १०० कोटी खर्चून आलिशान लग्न लावले होते.

---

### क्रिकेटपटू अंजिक्य रहाणे थांबला

मुंबई : भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज आणि माजी कर्णधार अजिंक्य रहाणे याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. सोशल मीडियावर एक अत्यंत भावुक व्हीडिओ पोस्ट करत त्याने आपल्या क्रिकेटच्या प्रवासाला पूर्णविराम दिला. ३८ वर्षांचा अजिंक्य गेल्या काही काळापासून भारतीय संघाबाहेर होता. जुलै २०२३ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध तो आपला शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. अजिंक्यने इंस्टाग्रामवर व्हीडिओ शेअर करत एक अत्यंत संवेदनशील पोस्ट लिहिली आहे. 'कॅप २७८ आता निरोप घेत आहे. इतक्या वर्षांत तुम्ही दिलेल्या प्रेमासाठी आणि पाठिंब्यासाठी मी कायम ऋणी राहीन,' अशा शब्दांत त्याने चाहत्यांचे आभार मानले. मुंबईच्या मैदानातून आपल्या क्रिकेट प्रवासाची सुरुवात करणाऱ्या अजिंक्यने कठीण परिस्थितीत भारतीय संघासाठी नेहमीच संकटमोचकाची भूमिका बजावली. परदेशी मैदानांवर, विशेषतः ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकेत त्याने खेळलेल्या महत्त्वपूर्ण खेळी नेहमीच लक्षात राहतील. त्याच्या या निवृत्तीमुळे भारतीय क्रिकेटमधील एका शांत, संयमी आणि अत्यंत आदरणीय पर्वाचा अंत झाला आहे.

## राममंदिर देणगी चोरीवर संसद परिसरात आंदोलन

# लोकसभेत गदारोळ, दुपारी 2 पर्यंत तहकूब

## पेपरफुटीशी संबंधित विधेयक राज्यसभेत सादर होईल

वृत्तसंस्था ३० जुलै

नवी दिल्ली : गुरुवारी सकाळी ११ वाजता लोकसभा आणि राज्यसभेच्या कामकाजाला सुरुवात झाली. आज पावसाळी अधिवेशनाचा नववा दिवस आहे. पेपरफुटीशी संबंधित विधेयकासह अनेक महत्त्वाच्या विधेयकांवर सभागृहात चर्चा होणार आहे,तर दुसरीकडे विरोधी पक्ष विद्यार्थी आंदोलकांवरील पोलीस कारवाई आणि राम मंदिर देणगी वादासारख्या मुद्द्यांवरून सरकारला घेरण्याची तयारी करत आहे.

संसद कामकाज सुरू होण्यापूर्वी विरोधी खासदारांनी गुरुवारी सकाळी १०:३० वाजता मकर द्वार येथे निदर्शने केली. त्यांनी २० जुलै रोजी जंतर-मंतरवर विद्यार्थी आंदोलकांवर झालेल्या पोलीस कारवाई आणि अयोध्येतील राम मंदिरात निधी चोरीच्या आरोपावरून केंद्र सरकारविरोधात निषेध नोंदवला. प्रियांका गांधी या निदर्शनांमध्ये सहभागी झाल्या. राज्यसभेत दुपारी २ वाजल्यापासून पेपरफुटीशी संबंधित सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) सुधारणा विधेयक-२०२६ सादर केले जाईल. यावर सुमारे सात तास चर्चा होण्याची शक्यता आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे चर्चेत भाग घेतील. लोकसभेत सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) सुधारणा विधेयक, २०२६ वर चर्चा होणार आहे.




नीट पेपरफुटीचा निषेध करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईवरून विरोधी पक्षांनी राज्यसभेत गोंधळ घातला. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षांनी गृहमंत्री यांच्या निवेदनाची मागणी केली. त्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्याने विरोधी पक्षांनी सभात्याग केला.

संसद परिसरात काँग्रेसचे आंदोलन, प्रियांका गांधी यांनी शहा यांच्या विरोधात घोषणाबाजी केली.काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदेच्या मकर गेटवर आंदोलन केले. प्रियांका गांधी या आंदोलनात सहभागी झाल्या.२० जुलै रोजी सीजेपीच्या आंदोलकांवर झालेल्या पोलीस कारवाईच्या निषेधार्थ विरोधी पक्षांच्या खासदारांनी गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात निदर्शने केली आणि या कारवाईसाठी जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली.

काँग्रेसचे खासदार मनीष तिवारी यांनी लोकसभेत नवीन पक्षांतरबंदी कायद्यावर चर्चा करण्याची मागणी करत स्थगन प्रस्तावाची नोटीस सादर केली. त्यांनी असा युक्तिवाद केला की, संधीसाधू राजकीय पक्षांतरांना प्रतिबंध करणारी आणि त्याच वेळी खासदार व आमदारांच्या प्रामाणिक विरोधाच्या आवाजाचे संरक्षण करणारी कायदेशीर चौकट तयार करण्यासाठी विद्यमान कायद्यात सुधारणा केली पाहिजे.

अलीकडेच, ज्येष्ठ वकील आणि खासदार कपिल सिब्बल यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे. या याचिकेत, आमदार आणि खासदारांना पक्ष विलीनीकरणाद्वारे अपात्रतेतून सुटका मिळवण्याची परवानगी देणाऱ्या १० व्या अनुसूचीतील तरतुदीला आव्हान देण्यात आले आहे. न्यायालयाने कायद्याच्या कार्यपद्धतीवरही गंभीर प्रश्न उपस्थित केले आणि हा विषय संसदेत चर्चेला यावा, असे म्हटले.

## पूर्णा प्रकल्पातून विसर्ग वाढवला

### गावांना सतर्कतेचा इशारा

प्रतिनिधी ३० जुलै

अमरावती : जिल्ह्यातील पूर्णा मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात पाण्याची आवक सातत्याने सुरू असल्याने धरणातील पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. आज, दिनांक ३० जुलै २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजेच्या सुमारास पूर्णा धरणाची पाणी पातळी ४५०.०९ मीटर नोंदवली गेली असून, प्रकल्पात २७.११२४ द.ल.घ.मी. (७६.६५ टक्के) इतका उपयुक्त पाणीसाठा जमा झाला आहे. धरणामधील वाढती पाणी पातळी विचारात घेऊन प्रशासनाने पूर नियंत्रणासाठी पाण्याचा विसर्ग वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आज सकाळी १०:०० वाजता धरणाचे ३ दरवाजे १० सेमीवरून २० सेमीपर्यंत उचलण्यात आले आहेत. पाण्याचा विसर्ग वाढवून तो ४८.०१ घनमीटर प्रतिसेकंद (क्युमेक्स) करण्यात आला आहे. नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह वाढल्यामुळे पूर्णा नदीकाठच्या सर्व गावांना पूर नियंत्रण कक्षाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांनी नदीपात्रात उतरणे टाळावे, तसेच गुराढोरांना सुरक्षित स्थळी हलवावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# लाडक्या बहिणींची अंतिम आकडेवारी जाहिर

## 1.66 कोटी महिला पात्र, 66 लाख अपात्र

प्रतिनिधी ३० जुलै

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळं महायुती सरकारला सत्ता मिळवून देण्यामध्ये महत्त्वाची ठरली होती. महिला व बालविकास विभागानं या योजनेचा लाभ पात्र महिलांना मिळावा म्हणून ई-केवायसी प्रक्रिया सुरु केली होती. ई-केवायसी प्रक्रियेनंतर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची अंतिम आकडेवारी समोर आली आहे. या योजनेसाठी १.६६ कोटी महिला पात्र ठरल्या आहेत, या संदर्भात टाइम्स ऑफ इंडियानं वृत्त दिलं आहे.

तर, ६६ लाख महिलांनी ई- केवायसी प्रक्रिया न केल्यानं त्यांची नावं योजनेच्या लाभार्थ्यांच्या यादीतून वगळण्यात आली आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्य सरकारकडून २८ जून २०२४ ला शासन निर्णय जारी करत सुरु करण्यात आली होती.

या योजनेतून महिलांच्या खात्यात दरमहा १५०० रुपये जमा केले जातात. पात्र महिलांसाठी वयोमर्यादेची अट २१ ते ६५ वर्ष इतकी आहे. संबंधित लाभार्थी महिलेच्या कुटुंबाचं उत्पन्न अडीच लाखांपेक्षा अधिक नसावं, ही प्रमुख अट या योजनेची होती.

महिला व बाल विकास विभागाकडे २ कोटी ६३ लाख महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी नोंदणी केली होती. पहिल्या हप्त्याचं वितरण केलं तेव्हा लाभार्थ्यांची संख्या २.४७ कोटी इतकी होती. यामध्ये ई केवायसी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आणि चारचाकी वाहनं नावावर असणाऱ्या महिला, शासकीय नोकरीत असणाऱ्या महिलांची नावं कमी झाल्यानंतर लाभार्थ्यांची संख्या घटली आहे.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी काही दिवसांपूर्वी लाडकी बहीण योजनेचा हप्ता जास्त वाढवायचा का, यासंदर्भात मुख्यमंत्री निर्णय घेतील, असं अमरावती येथे बोलताना म्हटलं होतं.

लाडकी बहीण योजनेतील ई- केवायसी करण्यासाठी सरकारने सहा महिन्याची मुदत दिलेली आहे. ज्या महिलांनी एकदा केवायसी पूर्ण केली, मात्र त्यात काही उणीवा राहून गेल्यात त्यांना दुरुस्त करण्याची संधी देण्यात आली आहे, अशी माहिती आदिती तटकरेंनी दिली होती.

# 'एमआयडीसी'त बनावट दारूची फॅक्टरी

प्रतिनिधी ३० जुलै

सोलापूर : मोहोळ तालुक्यातील चिंचोळी एमआयडीसीतील एका गोडावूनमध्ये बनावट टँगो पंच व भिंगरी दारू बनविणारी फॅक्टरीच आढळली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने त्या गोडावूनवर बुधवारी (ता. २९) छापा टाकला. त्यावेळी गोडावूनमध्ये बनावट दारूसाठी आणलेले स्पिरीट, बॅरेल, बॉक्स, रिकाम्या बाटल्यांचे ढिग, मशिन आढळली. तेथून तब्बल अडीच कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सोलापूर-पुणे महामार्गावरील चिंचोळी येथे जिल्ह्यातील सर्वांत मोठी एमआयडीसी आहे. काही महिन्यांपूर्वी मुंबई पोलिसांनी याच एमआयडीसीतून एमडी ड्रग्ज पावडर जप्त केली होती. त्यानंतर आता या एमआयडीसीतील गोडावूनमध्ये चक्क अवैध दारूनिर्मितीचा कारखानाच सापडला आहे. गोपनीय माहितीवरून राज्य उत्पादन शुल्क विभागाने बुधवारी सकाळी १० च्या सुमारास त्याठिकाणी छापा टाकला. त्यावेळी बाहेरून सिमेंट कंपाउंड असलेल्या मोठ्या गोडावूनमध्ये हा सगळा प्रकार आढळला. त्या गोडावूनबाहेर दारू वाहतुकीसाठीची वाहनेदेखील होती. चिंचोळी एमआयडीसीतील एका गोडावूनमध्ये अवैध दारूनिर्मिती आणि दुसऱ्या दोन गोडावूनमध्ये तेथे बनविलेली दारू ठेवली होती. या गोडावूनमध्ये १४ हजार लिटर स्पिरीट (७० बॅरेल), ४७० बॉक्स दारू, सात वाहने, बॉटलिंगच्या दोन मशिन होत्या. सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी त्याच ठिकाणी होते. गोडावून कोणाचे आहे, अवैध फॅक्टरीचा सूत्रधार कोण, याची माहिती अधिकारी घेत होते. या कारवाईत सातजण निष्पन्न झाले असून, त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या गोडावूनमध्ये काम करणारे कामगार परराज्यातील, विशेषतः बिहारमधील आहेत.

## नवे शिक्षणमंत्रीही विचित्रच-दिपके

छत्रपती संभाजीनगर : विद्यार्थी आंदोलनाचे नेतृत्व करणारे अभिजित दिपके यांनी छत्रपती संभाजीनगर येथील निवासस्थानी पत्रकार परिषद घेत केंद्र सरकार, भाजप आणि पोलिस प्रशासनावर गंभीर आरोप केले. विद्यार्थ्यांवरील लाठीमार, दगडफेक आणि पोलिसांच्या कारवाईबाबत पूर्वनियोजन करण्यात आल्याचा दावा करत त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. रामदेव बाबा यांच्यावरही दिपके यांनी निशाणा साधला.अभिजीत दिपके म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांचा फोटो घेऊन चालणे, जय भीमचे नारे देणे आणि लोकशाहीसाठी रस्त्यावर उतरणे म्हणजे जर संस्कृती बदनाम करणे असेल, तर रामदेव बाबांना सांगा की होय, आम्ही संस्कृती बदनाम करतोय, ते म्हणाले, रामदेव बाबांनी आमच्यावर बोलण्यापेक्षा त्यांच्या पतंजलीच्या उत्पादनांवर लक्ष द्यावे.



# गौरव शर्माने तोंड उघडले तर.. अनेक 'बडे मासे' गळाला लागतील !

प्रतिनिधी ३० जुलै

अकोला : अवघ्या १५ दिवसांपूर्वी अन्न व औषध प्रशासन आणि स्थानिक गुन्हे शाखेने अकोल्यात मारलेल्या धाडीने संपूर्ण महाराष्ट्र हादरला. केवळ अकोल्यातच नव्हे, तर महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच थेट अवैध गुटखा निर्मितीच्या फॅक्टरीवर पोलिसांचा बुलडोझर फिरला. एमआयडीसीत भाड्याच्या जागेत उघडपणे सुरू असलेल्या या दोन्ही बनावट गुटखा फॅक्टऱ्यांचा मास्टरमाइंड दुसरा तिसरा कोणी नसून गौरव अशोक शर्मा हाच आहे.

१६ जुलैच्या त्या सकाळी एफडीएने धाड टाकली अन् हा महाभाग गायब झाला...की त्याला गायब करण्यात आले ? असा आता थेट सवाल उपस्थित होत आहे.गुटख्याच्या निर्मितीपासून ते थेट वितरणापर्यंतची 'ए टू झेड' गुपिते केवळ गौरव शर्माच्याच पोटात आहेत. त्यामुळेच, तो पोलिसांच्या हाती लागला तर 'आपली मान अडकेल' या भीतीपोटी या प्रकरणातील मुख्य गुंतवणूकदारच त्याच्या अटकेत खोडा घालत आहेत का ? त्याच्या अटकेला जितका उशीर करता येईल, तितका लावण्यासाठी 'अदृश्य हात' सक्रीय झाले आहेत का ? असा घणाघाती सवाल आता विचारला जात आहे.



### एमआयडीसी त्या जागांवर हातोडा मारणार का ?

» औद्योगिक वसाहतीत राजरोसपणे, कायद्याची पायमल्ली करत राज्यामध्ये बंदी असलेला विषारी, नकली गुटखा तयार केला जात होता. ज्यांच्या नावावर या जमिनी दिल्या गेल्या, त्यांनी या काळ्या धंद्याला खतपाणी घातले. आता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ या बेकायदेशीर उद्योगांना जागा देणाऱ्यांवर कारवाई करून त्या जमिनी तात्काळ जप्त करणार का ?. एमआयडीसीच्या पोटात अजून एक—म्हणजे तिसरा गुटखा कारखाना धडधडत असल्याच्या चर्चांनी अकोल्यात चांगलाच पेट घेतला आहे. जरी याला अद्याप अधिकृत पुष्टी मिळालेली नसली, तरीही पोलीस आणि यंत्रणांकडून या तिसऱ्या कारखान्याची कसून शोधमोहीम सुरू असल्याची खळबळजनक माहिती समोर येत आहे.

### अटकेला उशीर कोणासाठी?

» गुटख्यासाठी लागणारा कच्चा माल, धोकादायक केमिकल्स आणि संपूर्ण राज्यातील विक्रीचे नेटवर्क उभारण्यात गौरव शर्माचा थेट हात होता. पण मुख्य प्रश्न असा आहे की—या काळ्या धंद्यात करोडो रुपये ओतणारे 'पडद्यामागचे सूत्रधार' कोण ? गौरव शर्मा जर पोलिसांच्या हाती लागला आणि त्याने तोंड उघडले,तर फॅक्टरीमागे पैसा लावणारे बडे प्रस्थ चव्हाट्यावर येतील. बनावट माल पुरवणारे आणि तो विकणारे थेट जाळ्यात येतील. जागा देणारे गोदाम मालक केवळ भाडेकरू होते की यात त्यांचाही कटकारस्थान भाग होता, हे स्पष्ट होईल. विषारी गुटखा कुठे-कुठे पुरवला गेला, याचा कच्चाचिट्ठा बाहेर येईल.

# मनपाची परवानगी न घेता महावितरणची मनमानी

## जिवघेण्या 33 केव्हीची अंडर ग्राऊंड केबल टाकताना नियमबाह्य काम

प्रतिनिधी ३० जुलै

अकोला : महावितरण कंपनीने महापालिकेची कुठली ही परवानगी न घेता गोरक्षण रोडवर ३३ केव्ही ची अंडर ग्राउंड केबल टाकण्याचा उद्योग केला. या विषयी महापालिकेचे मुख्य अभियंता अजय गुजर यांनी महावितरण कंपनीने कुठली ही परवानगी न घेता केबल टाकल्याचे स्पष्ट केले. तर सिंधी कॅम्प रोडवर अंडर ग्राउंड केबल टाकताना आवश्यक ती उपाययोजना केली नसल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांशी या विषयी संपर्क केला असता त्यांनी उडावाउडवीचे उत्तर आमच्या प्रतिनिधीला दिले. तर उगाच विषय लांबविला जात असल्याची ओरड केली. त्याच बरोबर ती ३३ केव्ही नाही तर ११ केव्हीची वायर आहे असे म्हणत कुठली ही अधिकृत माहिती दिली नाही. त्यामुळे महावितरण कंपनीची या विषयावर अधिकृत भूमिका कळू शकली नाही.

महावितरण कंपनीने गोरक्षण रोड सब स्टेशन येथून थेट सिंधी कॅम्प रोडवर अंडर ग्राऊंड केबल टाकत नवा प्रताप केला आहे. अंडर ग्राउंड केबल टाकण्यासाठी चे सर्व नियम तर धाब्यावर बसविलेच पण, महापालिकेचे पैसे न भरता, परवानगी न घेता हे काम केल्याची धक्कादायक माहिती मिळाली. महापालिकेकडे महावितरण कंपनीने अंडरग्राउंड केबल टाकण्याची केवळ परवानगी मागितली. ती आम्ही दिली नाही. महावितरण कंपनीने या साठी आवश्यक तो पैसा महापालिकेत भरला नसल्याची माहिती महापालिका अभियंता अजय गुजर यांनी दिली. नजीकच्या नाल्यातून ही केबल कुठल्याही सुरक्षा उपायांशिवाय अंडर ग्राऊंड पध्दतीने टाकण्यात आल्याची धक्कादायक माहिती मिळाली असून यामुळे स्थानिक नागरीकांच्या जीवाला धोका उदभवू शकतो अशी माहिती मिळाली आहे.





### 'मेटेंन्स कामातील पार्टनर आणि रासलिला'

» महावितरण च्या मेटेन्स कामातील पार्टनर कोण अशी विचारणा आता होत आहे. शुक्रवारी वर्धे पर्यंत कॉन्ट्रक्टरच्या गाड्यांनी जाणे आणि सोमवारी दूपारी १ वाजता ऑफिस मध्ये येणारे ते महावितरणच्या वरिष्ठांचा अशा बोगस कामांमध्ये थेट पार्टनरशीप असून त्याची चौकशी महावितरणने करण्याची गरज आहे. इतकेच नाही तर नुकत्याच वाढदिवसाच्या पार्टीत आणि तत्पुर्वी हॉटेल रासलिला मध्ये कोणाचा सहभाग आहे याची ही चौकशी महावितरणच्या वरिष्ठांनी करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# सहकार मंत्र्यांचा गौरव सोहळा!

प्रतिनिधी ३० जुलै

अकोला: दि अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने सेवा सहकारी सोसायट्यांच्या सक्षमीकरणासाठी भरीव योगदान दिल्याबद्दल राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांचा विशेष सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

शनिवार, दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११वाजता बँकेच्या मुख्य कचेरीत हा सोहळा पार पडणार आहे.

गेल्या ११७ वर्षांची प्रदीर्घ परंपरा असलेल्या अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ग्रामीण भागातील शेतकरी आणि सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी नेहमीच पुढाकार घेतला आहे. सेवा सहकारी सोसायट्यांच्या सक्षमीकरणात सहकार मंत्र्यांचे मोठे सहकार्य लाभल्यामुळे या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सत्कारमूर्ती म्हणून सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सहकार नेते डॉ. संतोषकुमार वामनराव कोरपे, प्रमुख अतिथी म्हणून आमदार रणधीर सावरकर, माजी मंत्री सुभाषरावजी ठाकरे, आमदार अमित झनक यांची उपस्थिती राहील. शनिवार, १ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन दि अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुख्य कचेरी, सिव्हिल लाईन्स, अकोला येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमास शेतकरी बांधव, सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज संतोषकुमार कोरपे यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# अकोला-खंडवा-रतलाम ब्रॉडगेजमुळे 5 राज्ये थेट जोडणार - शेतकरी, व्यापारी, पर्यटकांना मोठा लाभ

विदर्भाच्या विकासासाठी वरदान ठरणाऱ्या _अकोला - खंडवा - रतलाम मीटर गेज ते ब्रॉडगेज रूपांतरण प्रकल्पाचे_ काम अंतिम टप्प्यात आले आहे. खासदार _श्री अनुप संजय धोत्रे_ यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून केंद्रीय रेल्वेमंत्री _श्री अश्विनी वैष्णव_ यांनी लोकसभेत याची माहिती दिली.

**319 किमी काम पूर्ण**

473 किमी लांबीच्या या मार्गापैकी _रतलाम - पातालपाणी 144 किमी, ओमकारेश्वर रोड - तुकाईतड 132 किमी आणि अकोला - अकोट 43 किमी_ असे एकूण 319 किमीचे ब्रॉडगेज काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामासाठी जमीन संपादन, पूल आणि स्टेशनचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

*5 राज्ये थेट जोडणार, 10 राज्यांना फायदा*

हा मार्ग पूर्ण झाल्यावर _मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश_ ही 5 राज्ये थेट जोडली जाणार आहेत. तसेच या मार्गामुळे _गुजरात, दिल्ली, हरियाणा, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, छत्तीसगड, कर्नाटक, तामिळनाडू आणि गोवा_ या दहा राज्यांमध्ये जाण्यासाठी विदर्भातील प्रवाशांना सुलभ आणि जलद सुविधा उपलब्ध होणार आहे.



***शेतकरी ते पर्यटक - सर्वांना लाभ***

या रेल्वे मार्गामुळे *शेतकऱ्यांना त्यांचा कापूस, सोयाबीन, धान्य थेट मोठ्या बाजारपेठेत नेण्यास सुविधा* होणार आहे. त्यामुळे शेतमालाला योग्य भाव मिळण्यास मदत होईल. व्यापारी आणि उद्योगांना* कच्चा माल व तयार मालाची स्वस्त वाहतूक करता येईल. वेगवेगळ्या भागात राहणाऱ्या नागरिकांना नोकरी, शिक्षण आणि आरोग्यासाठी प्रवास सुलभ होईल. तसेच ओंकारेश्वर, उज्जैन, इंदूरसारख्या धार्मिक आणि पर्यटन स्थळांना जाणाऱ्या पर्यटकांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. खा. अनुप धोत्रे म्हणाले, "हा केवळ रेल्वे मार्ग नाही तर विदर्भाच्या प्रगतीचा महामार्ग आहे. या प्रकल्पामुळे अकोला हे मध्य भारताचे महत्त्वाचे रेल्वे जंक्शन बनेल. शेतकरी, व्यापारी आणि सामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी जी आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव जी यांचे मी मनापासून आभार मानतो."

**किसान से पर्यटक तक - सभी को लाभ**

इस रेल मार्ग से *किसानों को अपना कपास, सोयाबीन, अनाज सीधे बड़ी मंडियों तक ले जाने की सुविधा मिलेगी. इससे *किसानों को उनकी उपज का उचित दाम मिलेगा.

व्यापारियों और उद्योगों को कच्चे माल और तैयार माल का सस्ता परिवहन संभव होगा. विभिन्न क्षेत्रों में रहने वाले नागरिकों को नौकरी, शिक्षा और स्वास्थ्य के लिए यात्रा आसान होगी. साथ ही ओंकारेश्वर, उज्जैन, इंदौर जैसे धार्मिक और पर्यटन स्थलों* पर जाने वाले पर्यटकों को भी बड़ी राहत मिलेगी.

# श्रमिक–शेतकरी राष्ट्रीय संमेलनात केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात एल्गार; 10 ऑगस्टपासून देशव्यापी आंदोलन



नवी दिल्लीच्या तालकटोरा स्टेडियम येथे केंद्रीय कामगार संघटना, प्रादेशिक संघटना आणि संयुक्त किसान मोर्चा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्रमिक–शेतकरी राष्ट्रीय संमेलनात अकोल्यातून कॉ. नयन गायकवाड व देशभरातील हजारो कामगार, शेतकरी आणि विविध जनसंघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले. संमेलनात केंद्र सरकारच्या कामगार, शेतकरी, सार्वजनिक क्षेत्र आणि लोकशाहीविरोधी धोरणांवर तीव्र टीका करण्यात आली. तसेच श्रमिक–शेतकरी ऐक्य अधिक बळकट करून देशव्यापी संघर्ष उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

संमेलनात कॉम्रेड अमरजीत कौर आयटक राष्ट्रीय महासचिव, कॉम्रेड राजन क्षीरसागर किसान सभा राष्टीय अध्यक्ष यांनी आपल्या म्हटले की केंद्र सरकारने लागू केलेल्या चार श्रम संहितांमुळे कामगारांचे संघटन स्वातंत्र्य, संपाचा अधिकार, सामूहिक वाटाघाटीचा अधिकार आणि सामाजिक सुरक्षा धोक्यात आल्याचा आरोप करण्यात आला. शेतकऱ्यांना हमीभाव, कर्जमाफी आणि शेतीचे कॉर्पोरेटकरण रोखण्याच्या मागण्यांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याची टीकाही करण्यात आली. देशातील वाढती बेरोजगारी, महागाई, सार्वजनिक उद्योगांचे खासगीकरण, शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील वाढते व्यापारीकरण, परीक्षा घोटाळे, असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न, कंत्राटी व निश्चित मुदतीच्या रोजगारातील वाढ तसेच लोकशाही अधिकारांवरील निर्बंध याविषयीही संमेलनात गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी कामगार–शेतकरी ऐक्य मजबूत करणे ही काळाची गरज असल्याचे मत प्रतिनिधींनी मांडले.

संमेलनात पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या : चारही श्रम संहिता व त्यांचे नियम तात्काळ रद्द करावेत; सर्व पिकांना सी-२ + ५० टक्के सूत्रानुसार कायदेशीर हमीभाव (एमएसपी) देऊन सरकारी खरेदीची हमी द्यावी.

वीज सुधारणा विधेयक मागे घ्यावे; सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खासगीकरण, निर्गुंतवणूक व राष्ट्रीय मालमत्तेची विक्री थांबवावी; सर्व कामगारांसाठी किमान वेतन ₹४२,००० करून ते महागाई भत्त्याशी जोडावे; मनरेगा अंतर्गत २०० दिवस रोजगार व ₹७०० दैनिक मजुरी द्यावी; सर्वांसाठी सामाजिक सुरक्षा, सार्वत्रिक पेन्शन आणि ईपीएस-९५मध्ये वाढ करावी; मंजूर रिक्त पदांवर तातडीने भरती करून रोजगारनिर्मिती करावी; शिक्षण व आरोग्यावरील सार्वजनिक खर्च वाढवावा; कंत्राटी, असंघटित, गिग व प्लॅटफॉर्म कामगारांना सामाजिक सुरक्षा द्यावी; तसेच महागाईवर नियंत्रण ठेवून सार्वत्रिक सार्वजनिक वितरण व्यवस्था प्रभावीपणे राबवावी.

संमेलनात आंतरराष्ट्रीय शांततेचा पुरस्कार करत युद्धविरोधी भूमिका मांडण्यात आली. देशातील संविधान, लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी सर्व लोकशाहीवादी शक्तींनी एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले. या संमेलनात १० ऑगस्ट रोजी देशभरातील कामगार कर्मचारी शेतकरी यांनी जिल्हा मुख्यालये व राज्यांच्या राजधानीत राज्यपाल कार्यालयांसमोर निदर्शने, मानवी साखळी, मागण्यांचे बिल्ले लावणे, रेल रोको, रस्ता रोको तसेच विविध आंदोलनात्मक कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. १० ऑगस्ट रोजी राष्ट्रव्यापी आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन कॉ. रमेश गायकवाड, कॉ. नयन गायकवाड, कॉ. सुनीता पाटील, कॉ. मायावती बोरकर कॉ. सुरेखा ठोसर कॉ. दुर्गा देशमुख, कॉ. सरोज मुर्तिजापूरकर, कॉ. ज्योती ताथोड, कॉ. सुनंदा पदमने, कॉ. महानंदा ढोक, कॉ. मंगला अढावु, कॉ. कल्पना महल्ले, कॉ. प्रिया वरोटे, कॉ. उषा देशमुख, कॉ. छाया वारके, कॉ. सविता प्रधान, कॉ. सुमित गायकवाड, कॉ. स्वाती गायकवाड, कॉ. पारस आगरकर, कॉ. मदन जगताप, कॉ. विद्याधर ढोरे, कॉ. संतोष मोरे सर्व सभासद जिल्हा तालुका कार्यकारणी अकोला यांनी केले आहे.

# समान नागरी कायद्याचा मसुदा, तरतुदी आणि उणिवा

समान नागरी कायदा मसुदा म्हणजे देशातील सर्व नागरिकांसाठी—त्यांच्या धर्माचा विचार न करता—विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, दत्तकविधान आणि मालमत्ता हस्तांतरण यांसारख्या वैयक्तिक बाबींसाठी एकच समान कायदा तयार करणे. भारतामध्ये उत्तराखंड हे स्वातंत्र्यानंतर समान नागरी कायदा लागू करणारे पहिले राज्य ठरले आहे. उत्तराखंड सरकारने तयार केलेला मसुदा (Draft) हा सध्या या विषयावर मुख्य संदर्भ मानला जातो.

**समान नागरी कायदा मसुद्यातील प्रमुख मुद्देः**

**१. विवाह आणि नोंदणी**

**समान वयः** लग्नासाठी मुलाचे वय किमान २१ वर्षे आणि मुलीचे वय किमान १८ वर्षे असणे अनिवार्य.

**विवाह नोंदणी :** सर्व धर्मांमधील विवाहांची नोंदणी करणे कायदेशीररित्या बंधनकारक. नोंदणी न केल्यास सरकारी योजनांचा लाभ मिळणार नाही.

**बहुपत्नीत्व/बहुपतीत्वावर बंदी:** एकाच वेळी एकापेक्षा जास्त विवाह करण्यावर पूर्णपणे बंदी.

**२. घटस्फोट आणि पोटगी**

**समान नियमः** घटस्फोटासाठी पुरुष आणि महिला दोघांनाही समान कायदेशीर अधिकार आणि कारणे लागू होतील.

**अनिष्ट प्रथांवर बंदी:** हलाला, इद्दत, आणि तिहेरी तलाक यांसारख्या प्रथांवर पूर्णपणे बंदी.

**पोटगीचा अधिकारः** घटस्फोटानंतर पत्नीला योग्य पोटगी मिळण्याची स्पष्ट तरतूद.

**३. वारसाहक्क आणि मालमत्ता**

**मुलगा आणि मुलीला समान हक्कः** वडिलांच्या किंवा कुटुंबाच्या संपत्तीवर मुला-मुलींना (तसेच विवाहित मुलींना) समान अधिकार मिळतील.

**आई आणि पत्नीचा अधिकारः** संपत्तीच्या वाटणीत आई आणि पत्नी यांनाही मुलांइतकाच समान वाटा मिळेल.

**अनौरस आणि औरस असा भेदभाव नाही:** सर्व मुलांना मालमत्तेवर समान हक्क राहील.

**४. दत्तक विधानः**

सर्व धर्मीय नागरिकांना मूल दत्तक घेण्याचा कायदेशीर अधिकार मिळेल.

दत्तक प्रक्रियेत महिलांना पुरुषांइतकेच समान अधिकार मिळतील.

**५. लिव्ह-इन रिलेशनशिप**

**नोंदणी अनिवार्यः** लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांना त्याची अधिकृत नोंदणी करणे बंधनकारक असेल.

**मुलांचे संरक्षणः** लिव्ह-इन संबंधातून जन्मलेल्या मुलांना वैध मानले जाईल आणि त्यांना सर्व कायदेशीर अधिकार व मालमत्तेत वाटा मिळेल.

**नोंदणी अनिवार्यः**

लिव्ह-इनमध्ये राहणाऱ्या जोडप्याला (त्यात राहू लागल्यापासून १ महिना पूर्ण होण्याच्या आत) स्थानिक निबंधकाकडे जाऊन नोंदणी करणे बंधनकारक आहे. नात्यातून बाहेर पडताना सुद्धा निबंधकाला अधिकृत माहिती देऊन नोंदणी रद्द करावी लागेल.

**वयोमर्यादाः** मुलीचे वय १८ वर्षे आणि मुलाचे वय २१ वर्षे असणे आवश्यक आहे. जर मुला-मुलीचे वय २१ वर्षांपेक्षा कमी असेल, तर नोंदणी करताना त्यांच्या पालकांना माहिती दिली जाईल.

फौजदारी कारवाईची तरतूदः लिव्ह-इनची नोंदणी न करता एकत्र राहिल्यास ३ महिन्यांपर्यंत तुरुंगवास किंवा १०,००० रुपये दंडाची तरतूद आहे.

**महिला आणि मुलांचे संरक्षणः**

जर पुरुषाने महिला जोडीदाराचा त्याग केला किंवा सोडले, तर महिलेला कोर्टाकडून पोटगी मागण्याचा पूर्ण अधिकार असेल.

लिव्ह-इन संबंधातून जन्मलेल्या मुलाला कायदेशीरदृष्ट्या 'वैध' मानले जाईल आणि त्याला सर्व वारसाहक्क मिळतील.

**काय वगळले आहे? (अपवाद)**

**आदिवासी समाज :** भारताची सांस्कृतिक विविधता आणि आदिवासींच्या विशेष परंपरांचा आदर करत अनुसूचित जमातींना (ST) या कायद्याच्या मसुद्यातून वगळण्यात आले आहे.धार्मिक विधीः लग्न किंवा पूजेच्या धार्मिक पद्धतींमध्ये हस्तक्षेप केला जाणार नाही. कायदा फक्त कायदेशीर अधिकारांशी संबंधित आहे.

**काही त्रुटी/उणिवाः**

१) जर महिला जोडीदाराने पुरूषाचा त्याग केला तर यावर काय तरतुदी आहेत, हे स्पष्ट केले नाही.


२) बहुपत्नीत्व/बहुपतीत्वावर बंदी केली आहे, परंतु यावर काय दंड किंवा शिक्षा कशी आहे याची स्पष्ट माहीती दिली नाही.

समान नागरी कायदा राज्यात लागू झाल्यास निश्चितच नागरीकांचे हित जपले जाईल.

**प्रा. प्रज्ञानंद थोरात**
मो 9822674487

# जलपुनर्भरण: सद्यस्थिती, आव्हाने आणि भविष्याची दिशा

"जल हेच जीवन आहे" हे वाक्य आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत, परंतु आजच्या काळात हे केवळ एक सुविचार न राहता अस्तित्वाची खरी गरज बनले आहे. वाढती लोकसंख्या, शहरीकरण, हवामान बदल आणि अनियंत्रित औद्योगिकीकरण यामुळे पाण्याची मागणी प्रचंड वाढली आहे. दुसऱ्या बाजूला, भूजलाचा (Groundwater) अमर्याद उपसा झाल्यामुळे विहिरी आणि बोअरवेल (कूपनलिका) कोरड्या पडत आहेत. अशा परिस्थितीत जलपुनर्भरण (Rainwater Harvesting and Groundwater Recharge) हा जलसंकटावर मात करण्याचा सर्वात प्रभावी आणि शाश्वत मार्ग ठरत आहे.



**१. जलपुनर्भरणाची सद्यस्थिती (Current Scenario)**

आज भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात जलपुनर्भरणाबाबत लोकांमध्ये जाणीव आणि जागृती वाढताना दिसत आहे. मात्र, प्रतिवर्षाच्या तुलनेत भूजलाची पातळी दिवसेंदिवस खालावत चालली आहे.

**भूजलाचा अतिउपसा:** केंद्रीय भूजल बोर्डाच्या (CGWB) अहवालानुसार, भारतातील अनेक राज्ये (पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि महाराष्ट्रातील काही भाग) भूजलाच्या संकटाचा सामना करत आहेत. महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक तालुके 'डार्क झोन' (अतिशोषण झालेले भाग) म्हणून घोषित झाले आहेत.

**पावसाच्या पद्धतीत बदल:** हवामान बदलामुळे पावसाचे दिवस कमी झाले आहेत, परंतु कमी वेळात जास्त पाऊस (Cloudbursts/Heavy Spells) पडण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे पाणी जमिनीवर जिरण्याऐवजी वाहून (Run-off) जाते.

**शासकीय उपक्रम:** महाराष्ट्रात 'जलयुक्त शिवार अभियान', 'मागेल त्याला शेततळे', आणि 'अमृत सरोवर' यांसारख्या योजनांद्वारे जलसंधारणाची आणि जलपुनर्भरणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेतली गेली आहेत.

**शहरी भागातील स्थिती:** मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये नवीन इमारतींसाठी 'रेनवॉटर हार्वेस्टिंग' (Rainwater Harvesting) सक्तीचे करण्यात आले आहे. परंतु, त्याची प्रत्यक्षात प्रभावी अंमलबजावणी अजूनही अपेक्षित स्तरावर पोहोचलेली नाही.

**२. जलपुनर्भरणाच्या प्रमुख पद्धती**

भूजलाची पुनर्रचना करण्यासाठी खालील पद्धतींचा अवलंब केला जातो:

छतावरील पावसाचे पाणी साठवणे (Rooftop Rainwater Harvesting): घरांच्या किंवा इमारतींच्या छतावर पडणारे पाणी पाईपद्वारे एकत्र करून ते विहिरी, बोअरवेल किंवा जमिनीत तयार केलेल्या खड्ड्यांमध्ये (Recharge Pits) सोडले जाते. शेततळी आणि बंधारे: ग्रामीण भागात नाले अडवून साखळी सिमेंट बंधारे (CNB), मातीचे नाला बांध, आणि शेततळ्यांच्या माध्यमातून पाणी अडवून जमिनीत जिरवले जाते. बोअरवेल पुनर्भरण (Bore-well Recharge): कोरड्या पडलेल्या बोअरवेलभोवती खड्डा करून, त्यात वाळू, बारीक खडी आणि कोळशाचे थर देवून गाळलेले पावसाचे पाणी थेट बोअरवेलमध्ये सोडले जाते.

**शोषखड्डे (Soak Pits):** घरातील किंवा परिसरातील सांडपाणी व पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्यासाठी शोषखड्ड्यांचा वापर केला जातो.

**३. सद्यस्थितीतील प्रमुख आव्हाने**

जलपुनर्भरणाबाबत प्रगती होत असली, तरी काही गंभीर आव्हाने समोर आहेत:

अंमलबजावणीतील उदासीनता: शहरांमध्ये नियमानुसार रेनवॉटर हार्वेस्टिंगची यंत्रणा उभारली जाते, पण नियमित देखभालीअभावी (Maintenance) ती काही वर्षांत बंद पडते.

**ज्ञानाचा आणि तंत्रज्ञानाचा अभाव:** ग्रामीण भागात शास्त्रीय पद्धतीने (Scientific Approach) पुनर्भरण न केल्यास दूषित पाणी भूजलात मिसळण्याचा धोका असतो.

**अतिक्रमण आणि काँक्रीटीकरण:** शहरांमध्ये जमिनीचे काँक्रीटीकरण झाल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत जिरण्यासाठी नैसर्गिक जागाच उरलेली नाही.

**सार्वजनिक सहभागाची कमतरता:** जलपुनर्भरणाकडे अजूनही बऱ्याचदा "शासनाचे काम" म्हणून पाहिले जाते, "माझे कर्तव्य" म्हणून नाही.

**४. उपाय आणि भविष्याची दिशा**

जलपुनर्भरण ही केवळ एक मोहीम न राहता ती लोक चळवळ (Mass Movement) बनणे गरजेचे आहे. यासाठी खालील गोष्टींवर भर देणे आवश्यक आहे:

लोकसहभाग (Community Participation): पाणी फाउंडेशनच्या 'सत्यमेव जयते वॉटर कप' सारख्या स्पर्धांनी हे सिद्ध केले आहे की, लोकसहभागातून गावेच्या गावे पाणीदार होऊ शकतात.

**तंत्रज्ञानाचा वापर:** जिओ-टॅगिंग, सॅटेलाईट मॅपिंग आणि भूगर्भीय सर्वेक्षणाचा वापर करून कुठे आणि कसे पुनर्भरण करावे, याचा अचूक आराखडा तयार करणे.

कडक नियमावली आणि प्रोत्साहन: ज्या इमारती किंवा संस्था प्रभावीपणे जलपुनर्भरण करतील, त्यांना मालमत्ता करात (Property Tax) सवलत देणे आणि नियम मोडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणे.

**जलसाक्षरता (Water Literacy):** शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक माध्यमांतून पाण्याचा पुनर्वापर आणि पुनर्भरणाचे महत्त्व सातत्याने रुजवणे.

**निष्कर्ष**

पाणी हा असा एकमेव नैसर्गिक स्त्रोत आहे ज्याला कोणताही कृत्रिम पर्याय नाही. आपण निसर्गाकडून जेवढे पाणी विहिरी आणि बोअरवेलच्या माध्यमातून उपसतो, तितकेच किंवा त्यापेक्षा जास्त पाणी जमिनीत परत पोहचवणे ही काळाची गरज आहे. जलपुनर्भरण ही आज केलेली गुंतवणूक उद्याच्या पिढीचे भविष्य सुरक्षित करेल. "पाणी अडवा, पाणी जिरवा" हा केवळ नारा न ठेवता ती आपल्या जीवनशैलीचा एक भाग बनवणे हेच आजच्या सद्यस्थितीत अत्यंत आवश्यक आहे.



# प्राध्यापक भरती सालाबादप्रमाणे (अ) पारदर्शकपणे?

महाराष्ट्रात ५०१२ अनुदानित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक भरती प्रक्रियेला सुरुवात झालेली दिसते,ही बऱ्याच वर्षापासून वाट पाहणाऱ्या इच्छूक उमेदवारांसाठी आशादायक बाब आहे. ही भरती प्रक्रिया ही पारदर्शक व निष्पक्षपणे होण्याची हमी राज्य शासनाने दिल्याने इच्छुक उमेदवारांसाठी उमेदवारांमध्ये उत्साह होता. महाराष्ट्र शासनाने डीएचई (एनओसी) हे पोर्टल पण निर्माण केले. यात खाजगी शिक्षण संस्था ज्यांचे अनुदानित महाविद्यालये आहेत त्यांना बिंदू नामावली तपासून सहायक प्राध्यापक भरतीची मान्यता दिली जात आहे. पण भरती प्रक्रिया ही ८ मार्च,२०१९ च्या महाराष्ट्र शासनाच्या महाविद्यालयीन सहायक प्राध्यापक भरती प्रक्रियेच्या निर्णयानुसारच होणार आहे. यात जोडपत्र २ मधील नमूद ३-ब तक्त्यानुसार उमेदवारांची निवड यादी तयार होणार आहे.त्यात शैक्षणिक कामगिरीसाठी ८४, संशोधनासाठी ०६ व मुलाखतीसाठी १० गुण देण्यात येणार आहे. यात पीएचडी अधिक एम.फिल. असलेल्या उमेदवारांना २५ गुण, जेआरफ/नेट/ सेट उत्तीर्ण उमेदवारांसाठी १० गुण आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने १ जुलै,२०२३ पासून सहायक प्राध्यापक पदासाठी नेट/ सेट/ स्लेट उत्तीर्ण असणे अनिवार्य केले आहे आणि फक्त पीएचडी धारकांना यातून सूट देण्यात आली आहे.

त्यामुळे पीएचडी जी अनिवार्य पात्रता नसताना त्याला २५ गुण देणे निश्चितच चूकीचे आहे. तसेच नेट/ सेट/ स्लेट परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य असताना त्याला १० गुण देणे अन्यायकारक आहे. यामुळे निवड यादीत फक्त पीएचडी धारकच अधिक राहण्याची शक्यता नाकारता येत नाही व नेट/ सेट/ स्लेट उत्तीर्ण उमेदवार निवड यादीत नसण्याची शक्यता पण नाकारता येत नाही.त्यामुळे *नेट/ सेट/ स्लेट उत्तीर्ण उमेदवारांसाठी ही भरती प्रक्रिया मोठी अन्यायकारक ठरू शकेल.*

८ मार्च,२०१९ चा शासन निर्णय लागू आता लागू करताना १ जुलै,२०२३ चे विद्यापीठ अनुदान आयोगाचे नेट/ सेट/ स्लेट बद्दलचे स्पष्टीकरण तरी लक्षात घेणे कायदेशीर रित्या महाराष्ट्र शासनाला बंधनकारक होते. तसेच *सहायक प्राध्यापक भरती प्रक्रिया ही सालाबादप्रमाणे संस्थाचालकांच्या अध्यक्षेखालीच होत असल्याने निष्पक्ष व पारदर्शकपणे भरती प्रक्रिया होईलच याबद्दल आता शाश्वती नाही* कारण या पध्दतीने होणाऱ्या पदभरतीत मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार (गैर) होण्याचे नेहमीच ऐकीवात येते.

येथे नमूद करावेसे वाटते की एकीकडे दि.२२ जुलै,२०२६ रोजी संचालक, उच्च शिक्षण,यांनी सहायक प्राध्यापक भरती प्रक्रियेसंदर्भात, माजी प्राचार्य एल. ए.पाटील यांच्या १६ फेब्रुवारी,२०२६ चा पत्राचा उल्लेख करीत, त्यांनी या सहायक प्राध्यापक भरती प्रक्रियेसंदर्भात केलेल्या सुधारणा/सूचना या धोरणात्मक असल्याने याबाबत शासन स्तरावर आदेश होण्याची विनंती ही मा.अप्पर मुख्य सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांना केली आणि दुसरीकडे सहायक प्राध्यापक भरती प्रक्रिया सुरू पण करण्यात आली.

सिटी न्यूज अकोला
गुरुवार, दि. ३० जुलै २०२६
Web. http://epaper:citynewssuperfast.com

# औरंगाबाद-लाडेगाव शेतशिवारातील अर्धवट रस्ता पूर्ण करा



वि.प्रतिनिधी ३० जुलै

**अकोट :** अकोट शहरातून जाणाऱ्या बोर्डी मार्गावरील औरंगाबाद-लाडेगाव शेतशिवारातील अर्धवट रस्ता तातडीने पूर्ण करण्यात यावा, अशी मागणी येथील शेतकऱ्यांनी आमदार प्रकाश भारसाकळे तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोळंके यांच्या शेतातील शिवमंदिरापर्यंत रस्त्याचे काम पूर्ण झाले असले तरी त्यापुढील रस्त्याचे डांबरीकरण अद्याप झालेले नाही. त्यामुळे रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून शेतकऱ्यांना शेतीकामासाठी तसेच शेतमालाच्या वाहतुकीसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात या रस्त्यावरून प्रवास करणे धोकादायक बनले असून अनेकदा जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

घोगा नाल्यावरील पुलाचे काम पूर्ण झाले असले तरी जोडरस्त्याचे काम रखडल्याने पुलाचा अपेक्षित लाभ शेतकऱ्यांना मिळत नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यासंदर्भात उपविभागीय अभियंता, बांधकाम उपविभाग, जिल्हा परिषद अकोला यांच्याकडेही अर्ज सादर करण्यात आला. अर्जात औरंगाबाद-लाडेगाव रस्त्याचे सुमारे ५०० मीटरपर्यंत डांबरीकरण झाले असून उर्वरित रस्ता अर्धवट अवस्थेत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. माकोडे यांच्या शेतापासून पुढील रस्त्याचे डांबरीकरण तातडीने करण्यात यावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

यावेळी शेतकरी सुभाष नागापुरे, क्षितिज गोरले, श्याम भास्कर, सचिन नागापुरे, सचिन दातिर, शेखर नागापुरे, अनिलकुमार पिलातर, श्रीकृष्ण माकोडे, संतोष भावे, देवानंद केदार, सनी बोडखे, श्याम भावे, महादेव भावे, शिवदास केदार, अक्षय नागापुरे, प्रमोद भगत आदी उपस्थित होते.


सामाजिक कार्यकर्ते अनिलकुमार पिलातर यांनी ही माहिती दिली.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी शेतक-यांनी आधार प्रमाणीकरण करावे

## जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे आवाहन

प्रतिनिधी ३० जुलै

**अकोला :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत जिल्ह्यातील पात्र लाभार्थी शेतक-यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. पात्र शेतक-यांना योजनेचा लाभ मिळण्यासाठी आधार प्रमाणिकरण व अग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक असणे आवश्यक आहे. तरी सर्व पात्र शेतकऱ्यांनी नजीकच्या आपले सेवा केंद्रावरुन सदर बाबीची पूर्तता करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे. योजनेचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. सदर बैठकीला सीईओ अनय नावंदर, व्यवस्थापक अग्रणी बँक, मुख्य कार्यकारी अधिकारी , दि अकोला – वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व राष्ट्रीयकृत बँकांचे जिल्हा समन्वयक तसेच व्यवस्थापक तसेच जिल्हा उपनिबंधक गीतेशचंद्र साबळे, अभयकुमार कटके, प्रशासकीय अधिकारी जिल्हा उपनिबंधक कार्यालय हे उपस्थित होते.



पोर्टलवर ९० हजार ८७९ कर्जखाती अपलोड करण्यात आली आहेत. त्यापैकी ४९२५० पात्र लाभार्थी शेतकऱ्याची यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यापैकी सद्य:स्थितीत २६२४४ शेतक-यांनी आधार प्रमाणीकरण केले आहे. अद्यापही २३००६ शेतक-यांची ई-केवायसी बाकी असून, ती त्यांनी तात्काळ करून घ्यावी. जिल्ह्यात ८०३ आपले सरकार सेवा केंद्रांवर आधार प्रमाणीकरण सुरू आहे. पात्र शेतकरी बांधवांपर्यंत बँकांनी व ग्रामस्तरावरील अधिकाऱ्यांनी पोहोचवून प्रमाणीकरण करून घ्यावे जेणेकरून जिल्ह्यातील एकही पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहता कामा नये, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.

योजनेच्या अंमलबजावणीला जिल्ह्यात वेग आला असून, पात्र शेतक-यांच्या याद्या गावनिहाय ग्रामपंचायत, संस्थेचे कार्यालय, तहसील कार्यालय, पंचायत समिती, सेतू केंद्र तसेच बँकेच्या शाखेवर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. योजनेच्या अंमलबजावणीसाठी तालुका समित्यांचे गठन करण्यात आले असून, तालुका स्तरावर तहसिलदार हे अध्यक्ष असून सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, हे सदस्य सचिव आहेत. सहकार व महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी, गटसचिव तसेच संबंधीत बँकाचे अधिकारी कर्मचारी यांच्यामार्फत लाभार्थी शेतक-यांनी संपर्क करून आधार प्रमाणीकरणाबाबत आवाहन केले जात आहे.गाव पातळीवर प्रसिद्ध केलेली यादी योजनेच्या पोर्टलवरील शेतकऱ्यांच्या थकबाकी रकमेत फरक असल्यास योजना पोर्टलवरील थकबाकीची रक्कम ग्राह्य धरावी. शेतकऱ्यास पोर्टलवर दिसणारी रक्कम मान्य असल्यास त्यांनी आधार प्रमाणिकरण करावे. शासनाने सर्व बँकांना 01/04/2026 नंतरच्या व्याजाची रक्कम न आकारण्याच्या सुचना दिलेल्या आहेत व सर्व बँकांनी ते मान्य असल्याचे लेखी कळविलेले आहे. कर्जमुक्ती झाल्यानंतर सर्व कर्जमुक्त शेतकऱ्यांचा याद्या सर्व बँकांचे शाखेस व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमध्ये प्रसिद्ध करण्यात येतील. कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या सर्व शेतकऱ्यांना संबंधीत बँकामार्फत खरीप पिक कर्जाची उपलब्धता होणार आहे. योजनेच्या पोर्टलवरील रक्कम किंवा पोर्टलवरील शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत इतर कोणताही तपशिल शेतकऱ्यास अमान्य असल्यास त्याने पोर्टलवर तक्रारीची नोंद करावी. सदर तक्रारीचे निवारण जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमार्फत केले जाईल, असे वर्षा मीना म्हणाल्या. आधार प्रमाणीकरणासंदर्भात अडचणी असल्यास आपल्या बँकेचे शाखा व्यवस्थापक, सेवा सहकारी संस्थेचे सचिव, संबंधीत तालुका उपनिबंधक / सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय, तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक गीतेशचंद्र साबळे यांनी केले आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटचा डंका

## चौथीचे 46 तर सातवीचे 52 विद्यार्थी पात्र

प्रतिनिधी ३० जुलै

**आलेगाव :** पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला असून, आता ही परीक्षा वर्ग पाचवीऐवजी वर्ग चौथी आणि वर्ग आठवीऐवजी वर्ग सातवीसाठी घेण्यात येत आहे. त्यानुसार एप्रिल महिन्यात घेण्यात आलेल्या वर्ग चौथी व वर्ग सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल काल जाहीर झाला. या निकालात जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट, आलेगावने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत यश संपादन केले.

शिष्यवृत्ती परीक्षेत वर्ग चौथीचे तब्बल ४६ विद्यार्थी तर वर्ग सातवीचे ५२ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. चौथीमधून विवेक तायडे याने प्रथम क्रमांक, पारस धनवे याने द्वितीय क्रमांक, तर सार्थक राठोड




याने तृतीय क्रमांक मिळविला. तसेच वर्ग सातवीमधून उरुष खान हिने प्रथम क्रमांक, प्रांजल क्षीरसागर हिने द्वितीय क्रमांक, तर सेजल राठोड हिने तृतीय क्रमांक मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष अक्षय जैन व मुख्याध्यापक महावीर जैन यांनी सर्व पात्र विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन व कौतुक केले. तसेच शाळेतून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांवर गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या यशात मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचाही यावेळी गौरव करण्यात आला. वर्ग चौथीचे वर्गशिक्षक श्री. विनोद नप्ते व सौ. सोनू खुळे तसेच वर्ग सातवीच्या वर्गशिक्षिका सौ. स्वाती थोराईत यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे परिवेक्षक निलेश पस्तापुरे व परिवेक्षिका श्रीमती चंदा मुर्तडकर उपस्थित होते. या यशाबद्दल विद्यार्थ्यांनी आपले यश शाळेचे आधारस्तंभ सुभाष जैन, अध्यक्ष अक्षय जैन, मुख्याध्यापक महावीर जैन, सर्व शिक्षक तसेच पालक यांच्या मार्गदर्शन व प्रोत्साहनाला समर्पित केले.

# सेंट पॉल अकॅडमीत गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी




वि. प्रतिनिधी ३० जुलै


**अकोट :** लाल बहादूर शास्त्री ज्ञानपीठ तसेच सेंट पॉल अकॅडमी येथे गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष नवनीत लखोटिया होते. कार्यक्रमास उपाध्यक्ष लुणकरण डागा, सचिव प्रमोद चांडक तसेच संस्थेच्या सदस्या शारदा लखोटिया व अवनी लखोटिया यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रामेश्वर पातोंड, इनचार्ज विशाल चादूरकर आणि कार्यक्रम व्यवस्थापक किरण मॅडम मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली.विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांमधून गुरुंचे जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनी अंतरा डिके आणि वेदिका अकोटकार यांनी केले. मुख्याध्यापक रामेश्वर पातोंड यांनी विद्यार्थ्यांना शिक्षकांप्रती आदरभाव, शिस्तप्रियता आणि अभ्यासातील सातत्य राखण्याचे महत्त्व सांगितले. श्रद्धा रहाटे हिने आभार प्रदर्शन केले.

# रोजगार मेळाव्यातील उमेदवारांना ऑफर लेटर

**अकोला :** जिल्हा रोजगार मेळावा समन्वय समितीमार्फत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा पार पडला. या प्रसंगी विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झालेल्या ६६ उमेदवारांना ऑफर लेटरचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला रोजगार मेळावा समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ. रणजित पाटील, जिल्हा रोजगार मेळावा समन्वय समितीचे अनंत केदारे, महेंद्र कवीश्वर, सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके, नागेश देशपांडे, कौशल्य विकास अधिकारी, पूनम रजाने, कौशल्य विकास अधिकारी प्रामख्याने उपस्थित होते. ऑफर लेटर केव्हा मिळेल याची उमेदवार विजयी पाहत होते. ते हाती पडल्याने उमेदवारांनी समाधान व्यक्त केले. इतकेच नाही तर सुटकेचा श्वास घेतला. संबंधितांसाठी ही प्रक्रिया महत्त्वाची ठरली.

# सुरेश पाचकवडे यांच्या 'वाळूवरची अक्षरे' कथासंग्रहाचे प्रकाशन



प्रतिनिधी ३० जुलै

**अकोला :** ज्येष्ठ साहित्यिक सुरेश पाचकवडे यांच्या 'वाळूवरची अक्षरे' या वेधक कथासंग्रहाचे प्रकाशन तोष्णीवाल ले आऊट स्थित प्रभात किड्स स्कूलच्या सभागृहात विदर्भ साहित्य संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ. गजानन नारे यांच्या हस्ते आणि कवी प्रशांत असनारे यांची प्रमुख उपस्थितीत झाले.

डॉ. गजानन नारे म्हणाले, सुरेश पाचकवडे चार दशकांपासून मराठी साहित्याचे मनन करीत आहेत. या साधनेतून आहे त्यांचा कथासंग्रह साकारला आहे." कवी प्रशांत असनारे म्हणाले की, "पाचकवडे हे उत्कृष्ट कवी आहेतच, शिवाय कथालेखक म्हणूनही त्यांचा नावलौकिक आहे. कथाकार सुरेश पाचकवडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "मानवी जीवन ही एक प्रकारची कथाच असते. माणूस जीवनाच्या वृत्ती, प्रवृत्तीची दखल, त्याची कथा, व्यथा, कधीकधी त्याची चित्रविचित्र वर्तणूक सूक्ष्मपणे टिपण्याचा प्रयत्न मी कथांमध्ये करीत असतो. विदर्भ साहित्य संघ शाखा अकोलाचे कार्याध्यक्ष डॉ. विनय दांदळे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन विदर्भ साहित्य संघ शाखा अकोलाचे सचिव प्रा. डॉ. सुहास उगले यांनी केले.

# एम. बी. कॉन्व्हेंटमध्ये विद्यार्थ्यांनी घडविले पंढरपूरचे दर्शन







प्रतिनिधी ३१ जुलै

**अकोला :** शहरातील एम. बी. कॉन्व्हेंटमध्ये आषाढी एकादशीनिमित्त भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. नर्सरी ते इयत्ता चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तर काही विद्यार्थ्यांनी भगवान विठ्ठल व माता रुक्मिणीची वेशभूषा साकारून उपस्थितांना जणू पंढरपूरचेच दर्शन घडविले.

सकाळी ८ वाजता शाळेच्या परिसरातून पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. "जय हरी विठ्ठल"च्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिरसाने दुमदुमून गेला. मुख्याध्यापिका ममता चावला व पूनम चौहान यांनी विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांचे पूजन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे धार्मिक महत्त्व सांगून शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना प्रसादाचे वितरण करण्यात आले.

जुलै महिन्याच्या प्रभारी वरिष्ठ शिक्षिका वंदना येवले तसेच प्राथमिक विभागाच्या शिक्षिका अंकिता धुरिया यांच्या मार्गदर्शनाखाली दया तिवारी, राशि पाठक आणि शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

# कालविस स्मशानभूमीत जुन्या वृक्षांचा वाढदिवस साजरा



प्रतिनिधी ३० जुलै

**हिवरखेड :** येथील कालविस स्मशानभूमीत जुन्या पिंपळवृक्षाचा सामाजिक कार्यकर्ते यांनी वाढदिवस साजरा केला. हे छोटेसे रोपटे गावचे पोलिस पाटील प्रकाश गावंडे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष संदीप इंगळे यांनी लावले होते. त्याचे संगोपन करण्याचे काम वासुदेव वाघ यांना दिले होते. आता मोठे झाड झाले आहे. आषाढी एकादशीला या वृक्षाचा २४ वा वाढदिवस साजरा करण्यात आला. पिंपळाची पूजा करण्यात आली. यावेळी उपस्थित ज्ञानदेव वाघ, संदीप इंगळे, संतोष शर्मा, बाळासाहेब नेरकर, जानकीराम तायडे,लखन राठी,अर्जुन खिरोडकार, उत्कर्ष नेरकर तसेच वृक्ष प्रेमी वासुदेव वाघ यांचा सर्वांनी मिळून शाल देऊन सत्कार करण्यात आला.

# वनदेवी साधिका परिवार व महिला मंडळात गुरू पौर्णिमा

प्रतिनिधी ३० जुलै

**मुर्तिजापूर :** शहरातील जुनी वस्ती, वकीलपुरा परिसरात वर्षा विलास वनस्कार यांच्या निवासस्थानी गुरुपौर्णिमेनिमित्त भावपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

वनदेवी साधिका परिवार व श्री गजानन महाराज उपासना महिला मंडळा च्या संयुक्त विद्यमाने परमपूज्य दीदी माँ साध्वी अर्पिताजी मानस भारती यांच्या प्रतिमेचे पूजन करून गुरुपौर्णिमा भक्तिभावाने साजरी करण्यात आली.



कार्यक्रमात उपस्थित साधिकांना गुरुभक्ती, सेवा, निष्ठा व शरणागती या तत्वांचे महत्त्व पटवून देण्यात आले. वक्त्यांनी सांगितले की, गुरुची आज्ञा पाळणे आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसार साधना करणे हेच शिष्याचे खरे कर्तव्य आहे. कार्यक्रमात नामस्मरण, पूजन आणि गुरुविषयीचे विचार यांचे भक्तिभावाने चिंतन झाले. उपस्थित महिलांनी भावपूर्ण वातावरणात गुरुपौर्णिमा साजरी केली.

वर्षा जवंजाळ, जया जवजाळ, ज्योती कांडलकर, माया यावले, सुषमा कांडलकर, शितल कांडलकर, मीनाताई पांडे, सारिका मडके, आरती पळसोकर, मंदाताई श्रीखंडे, भारती कोरडे, वर्षा वनस्कार,चैताली कावलकर, पुष्पाताई वरोकार, गायत्री मडगे, लक्ष्मी उचितकर, संध्याताई व्यवहारे, रेखा देवकर, सरला बोबडे,भारती कोरडे, प्रमिला लोखंडे, जया कोहळे, आणि राखी कोचर आदी.

# दिल्लीतील पोलीसांसोबत गैरवर्तन करणाऱ्या विरोधात कारवाईची मागणी



**अडगांव बु. :** दिल्ली येथील जंतर मंतरवरील आंदोलनादरम्यान पोलिसांशी गैरवर्तन करणाऱ्या दोषींवर कडक कारवाई ची मागणी अडगांव बु. भारतीय जनता पार्टी व भाजप युवा मोर्चाच्या वतीने माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनमोहनजी व्यास यांच्या नेतृत्वात हिवरखेड पोलीस स्टेशनला निवेदन सुपूर्द करुण करण्यात आली.

आंदोलनाच्या नावाखाली घुसखोरी करून हिंसाचार माजवणारे आणि कायदा-सुव्यवस्थेला गालबोट लावणारे दोषी नागरिक लोकशाही चौकटीबाहेर काम करत आहेत.

कर्तव्यावर असलेल्या पोलिसांशी गैरवर्तन करणाऱ्या अशा असामाजिक तत्वांवर कायद्यानुसार कठोर आणि तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी माजी जि.प.सदस्य डॉ. मनमोहन व्यास, नरेंद्र मानकर, अडगाव पत्रकार संघाचे अध्यक्ष पुरुषोत्तम निमकर्डे ,विलास वानखडे, मंगेश देशमुख,, दीपक कौठकार, अतुल चहाजगुणे, अमोल सातारकर, शुभम रायलकर, अभिजितआप्पा ढगे व इत्यादी भाजप व युवा मोर्चाचे कार्यकर्ते आणि गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. "पोलीस आमचा अभिमान आहेत" अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

# गुरुपौर्णिमेनिमित्त शहरात भक्तिमय वातावरण

**अकोला :** आषाढ शुद्ध पौर्णिमेनिमित्त साजऱ्या करण्यात आलेल्या गुरुपौर्णिमा उत्सवाने अकोला शहर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले. शहरातील प्राचीन मंदिरे, विविध धार्मिक संस्था, मठ तसेच शाळा-महाविद्यालयांमध्ये धार्मिक विधी, गुरु पूजन, पारायण, अभिषेक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरुचरणी कृतज्ञता व्यक्त केली.

शहराचे आराध्य दैवत असलेल्या श्री राजराजेश्वर मंदिरात श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथ पारायणाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने पारायणात सहभाग घेतला. विविध स्वामी समर्थ केंद्रांमध्ये



स्वामी समर्थांचे विधिवत पूजन, गुरु पूजन तसेच स्वामी चरित्राचे वाचन करण्यात आले.

शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांचे पूजन करून त्यांच्याप्रती आदर व्यक्त केला. यानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले असून विद्यार्थ्यांनी गुरूंच्या महत्त्वावर आधारित विविध सादरीकरणे केली. जुन्या शहरातील शिवनगर, डाबकी रोड, कौलखेळ चौक, टिळक रोड परिसरातील मोठ्या राम मंदिरातील श्री संत गजानन महाराज मंदिरात शेगावच्या संत गजानन महाराजांच्या मूर्तीचा वेदमंत्रोच्चारात अभिषेक व पूजन करण्यात आले. त्यानंतर शेकडो भाविकांच्या उपस्थितीत महाआरती संपन्न झाली. गुरुपौर्णिमेनिमित्त दिवसभर शहरातील विविध धार्मिक स्थळांवर भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. ३० जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## ३५ लाखांचा सिमेंट रस्ता पहिल्याच पावसात उखडला

प्रतिनिधी ३० जुलै

**घाटंजी :** शहरातील आंबेडकर वॉर्ड परिसरातील छोट्या पुलाला जोडणारा सुमारे ३४ लाख ५६ हजार रुपये खर्चुन दोन महिन्यांपूर्वी तयार करण्यात आलेला सिमेंट कॉंक्रीट रस्ता पहिल्याच पावसात उखडत चालला आहे. यावरून या कामाचा दर्जा स्पष्ट होतो.

नगरपरिषदेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या कार्यकाळातील हे पहिले मोठे विकासकाम मानले जाते. अशा या कामाचे पितळ पहिल्याच पावसात उघडे पडले. सार्वजनिक निधीतून लाखो रुपयांची कामे होत असताना त्याची गुणवत्ता तपासणारी यंत्रणा नेमकी कुठे आहे, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

नगरसेवकही या गंभीर प्रकारावर गप्प का?, निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाईची मागणी ते का करत नाही. नागरिकांच्या पैशांची उधळपट्टी होत असताना लोकप्रतिनिधींचे मौन अनेक शंका निर्माण करणारे ठरत आहे. जनतेच्या विश्वासाला तडा देणाऱ्यांवर कारवाई कधी होणार, ही मागणी आता घाटंजीकर करत आहे.

# झरीजामणीत 'मेघराजा' तुफान बरसला

प्रतिनिधी ३० जुलै

### राळेगाव-महागाववर मात्र अवकृपा!

**यवतमाळ :** जिल्ह्यात जुलैच्या अखेरच्या आठवड्यात पावसाचा जोर वाढला असला तरी पावसाचे हे वितरण अत्यंत असमान असल्याचे समोर आले आहे. ३० जुलैपर्यंतच्या अधिकृत माहितीनुसार जिल्ह्यात सरासरीच्या ९०.४ टक्के पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्याची जूनपासूनची अपेक्षित सरासरी ४१२.३ मिमी असताना प्रत्यक्षात ३७२.८ मिमी पाऊस झाला आहे.

एकीकडे झरीजामणी तालुक्याला पावसाने अक्षरशः झोडपून काढले असताना दुसरीकडे राळेगाव आणि महागाव तालुक्यांत पाऊस सरासरी गाठण्यासाठी अजूनही धडपडत असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यात झरीजामणी तालुक्यात सर्वाधिक तब्बल १६०.५ टक्के (५११.९ मिमी) पाऊस झाला आहे. याशिवाय दारव्हा (११६.३%), आर्णी (१११.८%), नेर (१०५.८%) आणि वणी (१०१.१%) या तालुक्यांनी सरासरीची १०० टक्क्यांची ओलांडली आहे.

मात्र, दुसरीकडे राळेगाव तालुक्यात केवळ ६५ टक्के पाऊस झाल्याने तेथे तूट मोठी आहे. यासोबतच बाभूळगाव (६७.२%) आणि महागाव (७०.३%) तालुक्यांतही सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने तेथील शेतकरी अजूनही दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. उर्वरित तालुक्यांमध्ये यवतमाळ (७४.४%), कळंब (७६.१%), घाटंजी (८०.०%), उमरखेड (८१.४%), पुसद (८६.४%), मारेगाव (९२.२%), दिग्रस (९५.५%) आणि केळापूर (९९.८%) अशी पावसाची नोंद झाली आहे.

संपूर्ण अमरावती विभागाचा विचार करता विभागात आजपर्यंत सरासरीच्या ८०.४ टक्के पाऊस नोंदवला गेला असून, विभागातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत यवतमाळ जिल्ह्याची स्थिती काहीशी समाधानकारक आहे.

### सहा महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टी

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्याला मान्सूनच्या मुसळधार पावसाने झोडपून काढले असून विशेषतः वणी आणि झरीजामणी तालुक्यांत पावसाने मोठा हाहाकार माजवला आहे. दोन्ही तालुक्यांतील तब्बल सहा महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची (६५ मिमीपेक्षा जास्त) नोंद झाली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अहवालानुसार, वणी तालुक्यातील रसा मंडळात सर्वाधिक ८५.५० मिमी पावसाची नोंद झाली, तर शिंदोला येथे ६९.७५ मिमी आणि कायर येथे ६५.५० मिमी पाऊस पडला. दुसरीकडे झरीजामणी तालुक्यातही खडकडोह (७१.०० मिमी), झरी (६९.२५ मिमी) आणि मुकुटबन (६८.५० मिमी) या मंडळांना पावसाने अक्षरशः झोडपून काढले. या तुफान पावसामुळे नद्या-नाल्यांना पूर आला असून सखल भागातील शेतात पाणी साचल्याने उभ्या पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे.




## विद्यार्थ्यांवरील आंदोलन गुन्हे मागे घ्या

### फिरोज खान यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी ३० जुलै

**पुसद :** राज्यात विविध आंदोलने व निषेध कार्यक्रमांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे तात्काळ मागे घेऊन त्यांचे भविष्य सुरक्षित करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते फिरोज खान यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. हे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांच्या मार्फत सादर करण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांवर दाखल झालेल्या गुन्ह्यांमुळे त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक भवितव्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. अशा गुन्ह्यांमुळे विद्यार्थ्यांना शासकीय नोकरी, स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण तसेच इतर क्षेत्रांतील संधी गमवाव्या लागू शकतात.

विद्यार्थी हे देशाचे भावी नागरिक असून त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्य घडविण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा आणि भविष्याचा विचार करून आंदोलनांच्या संदर्भात विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे तात्काळ मागे घेण्याचे आदेश राज्य शासनाने द्यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित राहावे, त्यांना न्याय मिळावा आणि त्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी राज्य सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही फिरोज खान यांनी व्यक्त केली.

## नगरपरिषदेत १९९० पूर्वीच्या जन्म-मृत्यू नोंदींचे संगणकीकरण रखडले!

### जीर्ण नोंदवह्या नष्ट होण्याच्या मार्गावर; नागरिकांना आठ-दहा दिवस प्रतीक्षा

प्रतिनिधी ३० जुलै

**उमरखेड :** नगरपरिषदेच्या अखत्यारीतील १९९० पूर्वीच्या जन्म व मृत्यू नोंदी सध्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असून त्या नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र समोर आले आहे. या जुन्या नोंदवह्यांचे अद्याप संगणकीकरण न झाल्याने नागरिकांना जन्म-मृत्यू दाखले मिळविण्यास मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शाळा-महाविद्यालय प्रवेश, शासकीय योजना, वारसा हक्क, पेन्शन, पासपोर्ट तसेच विविध शासकीय कामांसाठी जन्म-मृत्यू दाखल्यांची आवश्यकता असते. मात्र १९९० पूर्वीच्या नोंदी शोधण्यासाठी नगरपरिषद कर्मचाऱ्यांना जीर्ण नोंदवह्यांमध्ये हाताने शोध घ्यावा लागत असल्याने अर्जदारांना आठ ते दहा दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे. काही प्रकरणांमध्ये नोंदी शोधण्यास विलंब होत असल्याने नागरिकांना वारंवार नगरपरिषदेच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. यामुळे वेळ व आर्थिक खर्च वाढत असून सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होत आहे.



देशभरात शासकीय सेवा डिजिटल करण्यावर भर दिला जात असताना उमरखेड नगरपरिषदेतील अनेक दशकांपूर्वीच्या जन्म-मृत्यू नोंदी अद्याप संगणकीकरणाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे या महत्त्वाच्या नोंदींचे तातडीने डिजिटायझेशन करून त्यांचे कायमस्वरूपी जतन करावे तसेच नागरिकांना दाखले त्वरित उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी व्यवस्था उभारावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागणारे जातीचे दाखले, जात वैधता प्रमाणपत्र तसेच सामान्य नागरिकांना शासकीय कामांसाठी लागणारे जन्म-मृत्यू दाखले अत्यंत आवश्यक असतात. परंतु जुन्या नोंदी शोधण्यास कर्मचाऱ्यांना मोठा अडथळा निर्माण होत आहे. या विभागाचे नगराध्यक्ष नागरिकांच्या समस्यांची दखल घेतील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जुन्या नोंदवह्यांचे संरक्षण, डिजिटल स्कॅनिंग आणि संगणकीकरणासाठी विशेष मोहीम राबविण्याची आवश्यकता व्यक्त केली जात असून भविष्यात नागरिकांना जन्म-मृत्यू दाखले सहज व जलदगतीने उपलब्ध होतील, अशी अपेक्षा आहे.

## विदर्भ-मराठवाड्याच्या रेल्वे विकासासाठी खासदारांचा दिल्लीत पाठपुरावा

### वंदे भारत, नव्या रेल्वे सेवा आणि प्रलंबित मार्गांना मंजुरीची रेल्वे बोर्डाकडे मागणी

प्रतिनिधी ३० जुलै

**यवतमाळ :** विदर्भ-मराठवाड्यातील रेल्वे संपर्क अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने यवतमाळ-वाशीमचे खासदार संजय देशमुख आणि राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांनी रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष सतीश कुमार यांची भेट घेऊन विविध प्रलंबित रेल्वे प्रकल्प, नवीन रेल्वे सेवा आणि विद्यमान गाड्यांमध्ये सुधारणा करण्याबाबत सविस्तर निवेदन सादर केले. या मागण्यांवर सकारात्मक दृष्टीने विचार करून आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन रेल्वे बोर्डाच्या अध्यक्षांनी दिले.



विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये अद्यापही रेल्वे संपर्क मर्यादित असल्याने उद्योग, व्यापार, शिक्षण आणि दैनंदिन प्रवासावर त्याचा परिणाम होत असल्याचे खासदार देशमुख यांनी बैठकीत नमूद केले. या पार्श्वभूमीवर नांदेड-मुंबई वंदे भारत एक्सप्रेस अकोला मार्गे सुरू करून वाशीम आणि अकोला येथे थांबा देण्याची मागणी करण्यात आली. तसेच नांदेड-छत्रपती संभाजीनगर अथवा मनमाडपर्यंत वाशीम-अकोला मार्गे दररोज इंटरसिटी एक्सप्रेस सुरू करण्याचाही प्रस्ताव मांडण्यात आला.

याशिवाय जनशताब्दी एक्सप्रेसचा वाशीमपर्यंत विस्तार, वर्धा-नांदेड रेल्वेमार्गाचे काम गतीने पूर्ण करणे, मूर्तिजापूर-दारव्हा रेल्वेमार्गाला विशेष प्रकल्पाचा दर्जा देणे, वाशीम-बडनेरा तसेच वाशीम-दिग्रस-माहूर-आदिलाबाद या नव्या रेल्वेमार्गांना मंजुरी देण्याची मागणीही करण्यात आली.

नांदेड-कुर्ला एक्सप्रेसच्या वेळापत्रकात प्रवाशांच्या सोयीने बदल करणे, कायमस्वरूपी रॅक उपलब्ध करून देणे, नागपूर-कोल्हापूर एक्सप्रेस दररोज धावविणे, नांदेड-नागपूर पॅसेंजर तसेच नांदेड-पुणे (वाशीम-अकोला मार्गे) दैनंदिन रेल्वे सेवा सुरू करण्याच्या मागण्यांचाही निवेदनात समावेश होता.

या प्रस्तावांची अंमलबजावणी झाल्यास विदर्भ-मराठवाड्यातील लाखो प्रवाशांना अधिक सक्षम रेल्वे सुविधा उपलब्ध होतील. विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी आणि उद्योग क्षेत्रालाही त्याचा लाभ होऊन विभागाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास खासदार देशमुख यांनी व्यक्त केला.

बैठकीत मांडण्यात आलेल्या सर्व मागण्यांची दखल घेऊन संबंधित विभागांकडून त्यांचा सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष सतीश कुमार यांनी दिल्याची माहिती खासदारांच्या जनसंपर्क कार्यालयाने दिली.

## यवतमाळ जिल्ह्यातील बहुप्रतिक्षित पीक विमा मंजूर होणार

### केंद्रीय कृषिमंत्र्यांचे आश्वासन

प्रतिनिधी ३० जुलै

**उमरखेड :** सन २०२५-२६ मध्ये महाराष्ट्रभर पीक विमा लागू करण्यात आला असताना यवतमाळ जिल्ह्याला आणेवारीचे कारण पुढे करून वगळण्यात आले होते. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. या प्रकरणी उमरखेड-महागाव विधानसभेचे आमदार किसनराव वानखेडे व भाजपा यवतमाळ-पुसद जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी पाठपुरावा केला.

१५ जुलै रोजी राज्याचे कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्या दालनात बैठक झाली. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ सुधारित अहवाल पाठविण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानंतर २९ जुलै रोजी दिल्ली येथे केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या दालनात आमदार वानखेडे व नितीन भुतडा यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन विषय प्रकर्षाने मांडला. निवेदनाद्वारे उमरखेड व महागाव तालुक्यातील खरीप हंगामातील तीन वेळा झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन व कापूस पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे सांगितले.



प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत उत्पादनाचे मूल्यांकन पीक कापणी प्रयोग (CCE) आणि एमआरएसएसी रिमोट सेन्सिंग या दोन पद्धतींनी करण्यात आले. मात्र एमआरएसएसी अहवालात उत्पादन जास्त दाखविण्यात आले, तर प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगात उत्पादन कमी आढळले. या ५० टक्के मूल्यांकन पद्धतीमुळे जिल्ह्यातील सुमारे ११० महसूल मंडळे विमा लाभापासून वंचित राहिली. वेळेत प्रीमियम भरूनही अनेक शेतकऱ्यांना विमा मिळाला नाही. लगतच्या नांदेड जिल्ह्यात रिमोट सेन्सिंगने कमी उत्पादन दाखवले, तर यवतमाळात जास्त दाखवल्याची बाब संशयास्पद असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

पीक कापणी प्रयोग ही प्रत्यक्ष, पारदर्शक आणि वैज्ञानिक पद्धत असून तिचे निष्कर्ष अधिक विश्वासार्ह असल्याचे सांगत उमरखेड-महागाव तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना पीक विमा लाभ मिळावा, एमआरएसएसी अहवालाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी आणि पीक कापणी प्रयोगाच्या आधारे तात्काळ लाभ देण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली.

केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी या विषयात अतिशय सकारात्मक भूमिका घेतली. राज्य सरकारने यवतमाळ जिल्ह्यासाठी प्रत्यक्ष पीक कापणी अहवाल आधारभूत मानून सेटेलाईट अहवाल ग्राह्य धरू नये, असे पत्र आणा. त्या आधारे पीक विमा मंजूर करू, असे त्यांनी आश्वासन दिले. त्यामुळे उमरखेड व महागाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा पल्लवित झाल्या आहेत. यवतमाळ जिल्ह्याला पीक विम्याचा लाभ मिळावा यासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे व खासदार रामराव वडकुते यांनीही केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडे महत्त्वाची भूमिका बजावली.

■ यवतमाळ जिल्हा पीक विमा योजनेतून वगळण्यात आल्यानंतर पहिल्या दिवसापासून भाजपा यवतमाळ-पुसद जिल्हा समन्वयक नितीन भुतडा व आमदार किसनराव वानखेडे यांनी आक्रमक भूमिका घेतली. १५ जुलै रोजी मंत्रालयात कृषिमंत्री दत्ता भरणे यांच्याकडे विषय मांडला. परिणामी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी सुधारित अहवाल पाठविला. आता केंद्रीय कृषिमंत्र्यांनी थेट महाराष्ट्र सरकारचा पीक कापणी अहवाल मागितल्याने लवकरच प्रश्न सुटण्याची शक्यता आहे.

## आरोग्य सेवांच्या डिजिटल परिवर्तनावर भर

### आयुष्मान भारत डिजिटल मिशनची प्रभावी अंमलबजावणी करा : उपसंचालक डॉ. सुशीलकुमार वाघचौरे

प्रतिनिधी ३० जुलै

**यवतमाळ :** जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक गतिमान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी आयुष्मान भारत डिजिटल मिशनची प्रभावी अंमलबजावणी करणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन आरोग्य सेवा अकोला मंडळाचे उपसंचालक डॉ. सुशीलकुमार वाघचौरे यांनी केले. वसंतराव नाईक जिल्हा परिषद सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय आढावा बैठक व विशेष प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते.



आयुष्मान भारत डिजिटल मिशनच्या अंमलबजावणीसंदर्भात आयोजित या एकदिवसीय कार्यशाळेत जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. यावेळी आरोग्य विभागाच्या विविध योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

डॉ. वाघचौरे यांनी डिजिटल हेल्थ आयडी निर्मिती, रुग्णांच्या आरोग्य नोंदींचे डिजिटायझेशन, माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याबाबत मार्गदर्शन केले. डिजिटल आरोग्य व्यवस्थेमुळे रुग्णांना सुलभ, जलद आणि दर्जेदार सेवा उपलब्ध होतील, असे त्यांनी सांगितले.

बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. सुरेश आसोले, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हरी पवार, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. विशाल धांडे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कृष्णदास बानोत, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. तनवीर शेख, जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पुरुषोत्तम कीरवाले, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. स्मिता पेटकर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. प्रीती दुधे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी कैलास जवंजाळ, जिल्हा सार्वजनिक आरोग्य परिचारिका चंचला मुंदाणे, जिल्हा मूल्यमापन व संनियंत्रण अधिकारी प्रशांत भोयर, सुचिता ठाकरे, एजाज शेख, विस्तार अधिकारी बोंथलवर, राजेश फुटाणे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कैलास जवंजाळ यांनी केले. आभार प्रदर्शनानंतर बैठकीची सांगता झाली.

## यवतमाळ-आर्णी-माहूर-किनवट रेल्वे मार्गाला सर्व स्तरातून पाठबळ

प्रतिनिधी ३० जुलै

**आर्णी :** सर्वांगीण विकासासाठी रेल्वे मार्गांची गरज लक्षात घेऊन यवतमाळ-आर्णी-माहूर-किनवट रेल्वे मार्गाच्या मागणीसाठी स्थापन झालेल्या रेल्वे कृती समितीला सर्व स्तरातून मिळणारे पाठबळ उत्साहवर्धक आणि ऊर्जा देणारे असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रेल्वे कृती समितीचे अध्यक्ष सेवा निवृत्त गट शिक्षणाधिकारी ॲड. किशोर रावते यांनी केले.

मंगरूळ (कारखाना) येथे पार पडलेल्या सहविचार व समर्थन सभेत ते बोलत होते. आर्णी तालुक्यातील ग्रामपंचायती, धार्मिक व सामाजिक संस्था तसेच व्यापारी बांधव या मागणीसाठी सरसावले असून लोकप्रतिनिधी, खासदार व आमदारही पुढाकार घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

माहूर दत्तशिखराचे महंत डॉ. धनेश्वर भारती यांचे पाठबळ आणि आशीर्वादही या मागणीसोबत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी ग्रामपंचायत मंगरूळनेही समर्थनाचा ठराव मंजूर केला.

यापूर्वी महागाव तालुक्यातील हिवरा (एकविरा देवी संस्थान), आर्णी तालुक्यातील जवळा व लोणबेहळ ग्रामपंचायती, माहूर येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र तसेच दत्तगड शिखर माहूर येथे सर्वपक्षीय विचार व समर्थन सभा घेण्यात आल्या होत्या. आता यवतमाळ तालुक्यातील मंगरूळ (कारखाना) येथेही सभा संपन्न झाली. दिवसेंदिवस या मागणीसाठी समर्थन व देणगी-सहकार्य देणारे शेकडो हात पुढे येत असल्याचेही रावते यांनी सांगितले.

यावेळी सुरेश पवार, श्रीराम राऊत, संजय शिंदे पाटील, माजी जीपी सदस्य दयानंद मिश्रा, दत्ताजी भोयर, विनोद गिरी, सरपंच प्रतिभा आवझाडे, माजी सरपंच किशनराव भेडेकर, पुरुषोत्तम आवझाडे, अजबराव वलके, देवानंद जाधव, महादेव आवझाडे, पंडित पंचभाई, राजू मांडवकर, विजया भेडेकर, रामेश्वर गावंडे, मिलिंद ठाकरे, गणेश सोनने, दिलीप पोकर्णा, शंकर गावंडे, आकाश पौळ, मनोज रहाटे, गजानन सुर्यकार, देवानंद काळे, अरुण सोनटक्के आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
गुरुवार, दि. ३० जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


## विधी जनजागृती, कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर

**अमरावती :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात मंगळवार, दि. 28 जुलै रोजी 'विधी जनजागृती आणि कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर' उत्साहात पार पडले.यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे, प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख, प्रा. डॉ. नंदकिशोर के. रामटेके उपस्थित होते.न्यायरक्षक कार्यालयाचे सहायक अधिवक्ता अ‍ॅड. अंकुश इंगळे यांनी नाल्सा योजनेंतर्गत जागरूकता, शिक्षण, प्रतिबंध आणि पुनर्वसन उपायांवर मार्गदर्शन केले. . सहारे यांनी पर्यायी वाद निवारण पद्धती, त्याचे फायदे आणि नागरिकांची मूलभूत कर्तव्ये याबाबत मार्गदर्शन केले.

# दादासाहेब हे संत कुलगुरू होते; डॉ. अविनाश आवलगावकर यांचे गौरवोद्गार

प्रतिनिधी ३० जुलै



**अमरावती :** दिंडी, प्रवचन आणि कीर्तनाच्या माध्यमातून सामान्य माणसाला विज्ञान आणि आध्यात्माची सांगड घालून जीवन जगण्याचा नवा मार्ग देणारे प्रबोधन दादासाहेबांनी केले. शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदावर कुलगुरू म्हणून कार्य करणारे दादासाहेब हे आ्ध्यात्मिक क्षेत्रात प्रबोधन करणारे इतिहासातील पहिले आणि शेवटचे कुलगुरू होते असे गौरवोद्गार रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी काढले.

डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकिय महाविद्यालय परिसरातील छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृहात स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित स्व. दादासाहेब काळमेघ यांचा एकोणतिसावा पुण्यस्मरण कार्यक्रम पार पडला यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थ्ानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर येथील कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर, दैनिक तरूण भारतचे मुख्य संपादक शैलेष पांडे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलसचिव सुभाष बेलसरे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, तसेच विशेष अतिथी म्हणून सप्तखंजेरीवादक सत्यपाल महाराज यांची उपस्थिती होती. यावेळी मंचावर श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. गजानन पुंडकर, अ‍ॅड. भैय्यासाहेब पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, सदस्य केशवराव गांवडे, जनार्दन खोटरे, सुभाष बनसोड, सचिव वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य डॉ. अंबादास कुलट, अमोल महल्ले तसेच स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठानचे सचिव तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना कुलगुरू आवलगावकर म्हणाले की, दादासाहेबांनी समाजामध्ये वावरताना होणाऱ्या टिकाटिप्पणींची दखल न घेता आपल्या कार्याचा सरळ माग ठेवत अनेकांच्या जीवनात नवसंजीवनी निर्माण केली. आध्यात्म ही खरी शक्ती असून त्यांनी विज्ञानाच्या उंचीला पार करून आध्यात्माची उंची गाठली. माणसामध्ये देव शोधणाऱ्या संत गाडगे बाबा आणि भाऊसाहेबांचा वारसा दादासाहेबांनी चालविला आध्यात्म आणि विज्ञानाचा समन्वय साधून मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा विचार करणारे हे द्रष्टे नेतृत्व होते.

यावेळी शैलेष पांडे यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, दादासाहेबांनी नागपूर विद्यापीठात आपल्या अधिकाराचा वापर करून हजारो विद्यार्थी आणि सामान्य माणसाचे कल्याण केले आहे. दादासाहेबांच्या परिस्पर्शाने अनेकांचे जीवन उजळले.

इतिहासात आज आणि उद्या देखील त्यांच्या कार्याची दखल घेतली जाईल व आपल्यासाठी ते मार्गदर्शक राहतील. याप्रसंगी डॉ. महेंद्र ढोरे आणि सुभाष बेलसरे यांनी देखील दादासाहेबांच्या जीवनावर प्रकाश टाकून आपले अनुभव सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलताना हर्षवर्धन देशमुख यांनी दादासाहेबांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविकातून हेमंत काळमेघ यांनी दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठानची आयोजनामागची भुमिका तसेच दादासाहेबांच्या विचारांवर कार्य करत सुरू असलेल्या कार्याची माहिती दिली. तसेच दादासाहेबांवर प्रेम करणाऱ्या हजारो नागरिकांचे आभार देखील प्रकट केले. उल्लेखनिय म्हणजे सप्तखंजेरीवादक सत्यपाल महाराज यांनी प्रबोधनपर कीर्तनातून दादासाहेबांच्या अष्टपैलू व्यक्तीमत्वावर प्रकाश टाकून अनेक सामाजिक विषयावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. मंदा नांदूरकर तसेच आभार प्रदर्शन नगरसेवक डॉ. राजेंद्र तायडे यांनी केले.

या कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद, स्व. दादासाहेब काळमेघ यांच्यावर प्रेम करणारे ज्येष्ठ नागरिक, शिक्षक, कर्मचारी तसेच सामाजिक, राजकीय आणि सर्व क्षेत्रातील मान्यवर मंडळींची उपस्थिती होती.

# बस आणि ट्रकमध्ये भीषण धडक; एक ठार, तीन गंभीर तर चार किरकोळ जखमी

प्रतिनिधी ३० जुलै



**दर्यापूर :** आयेशा ट्रक व एसटी बस मध्ये जबर धडक झाल्याने यामध्ये आयेशा ट्रक मधील एक जण ठार तसेच ट्रक व बस मधील तीन जण गंभीर तर चार जण किरकोळ जखमी झाले आहे.

ही घटना आज सकाळी साडेसहा वाजता दरम्यान दर्यापूर अमरावती मार्गावर लखापूर फाटा ते आरळा फाट्याच्या मधात घडली. बस दर्यापूर वरून अमरावती कडे तर आयेशा ट्रक अमरावती वरून दर्यापूर कडे येत होता.

गंभीर जखमींना तातडीने दर्यापूर पोलीस व रुग्णसेवक गोपाल पाटील अरबट, विक्की होले, राहुल भुंबर, सचिन शेलारे यांनी घटनास्थळावर पोहोचवून जखमींना ट्रक मधून व बस मधून बाहेर काढून उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यांच्यावर या ठिकाणी प्राथमिक उपचार करण्यात आला.

उपचार दरम्यान आयेशा ट्रक मधील चालकाच्या बाजूला बसलेला श्याम महादेव बुटे( 30 रा. धामोरी) यांचा मृत्यू झाला आहे. तर गंभीर असलेले बस चालक गजानन तुळशीराम पाणीरे( 42 रा. खारतळे गाव ,) व वाहक संजय अर्जुन वानखडे (40 रा. आरळा ) यांना उपचारासाठी अकोला येथे रेफर करण्यात आले आहे. तर ट्रक मधील तुळशीराम अशोक कुपटे (26 रा. खोलापूर) हा गंभीर जखमी झाला आहे.

किरकोळ जखमी मध्ये मनोज महादेव तायडे ( 44 रा. साईनगर दर्यापूर, ),मनीष सकाराम चिमोटे,( 22 रा. परतवाडा,) प्रफुल रामदास कडू (41 रा. दर्यापूर) तर ट्रक चालक विशाल श्रीकृष्ण खोरडे( 30 रा. मध लापूर) हे सर्व किरकोळ जखमी झाले आहे. अपघात एवढा मोठा होता की, आयेशा ट्रक मध्ये चालकाचे बाजूला बसलेल्या व्यक्तिचे पाय ट्रक मध्ये फसले होते. त्यांना ट्रकचा काचा फोडून घटनास्थळावर गोपाल अरबट व त्यांच्या टीमने शर्तीचे प्रयत्न करून जखमीला बाहेर काढण्यात आले होते. उपजिल्हा रुग्णालय येथे डॉ. गुंजन गुल्हाने, डॉ. गुणवंत जढाल, अधीपरिचारिका शुभांगी राणे, मीनल बागडे, अटेंडन्स नितीन धुंदे व उपजिल्हा रुग्णालय दर्यापूरच्या टीमने सर्व जखमींवर उपचार केले. घटनेची माहिती मिळताच दर्यापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी उपजिल्हा रुग्णालयात दाखल होऊन त्यांनी रुग्णांची विचारपूस केली.

# अमरावती ग्रामीण पोलीसांची धान्य काळाबाजारी करणाऱ्यांवर धडक कार्यवाही

प्रतिनिधी ३० जुलै

**अमरावती :** निकेतन कदम, पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांनी कुठल्याही प्रकारचे अवैध व्यवसाय/काळाबाजारी तस्करी करणा-यांवर धडक कारवाई करण्याच्या सुचना अमरावती ग्रामीण घटकातील सर्व पोलीस स्टेशन प्रभारी तसेच स्थानिक गुन्हे शाखा यांना दिल्या आहे.

त्याअनुषंगाने अमरावती ग्रामीण हद्दीत पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांना सर्व पथकांना कारवाई करण्याबाबत सुचना दिल्या होत्या त्यावरुन स.पो.नि. संतोष गुर्जर स्था.गु.शा. अमरावती ग्रामीण व पथक हे कारवाई कामी पोलीस स्टेशन माहुली जहाँ हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहीती मीळाली की, MIDC मध्ये डवरगाव कडुन मोझरी तिवसा गावाकडे जाणा-या रोडवर बंद फॅक्टरी मध्ये अशोक लेलैंड पिकअप क्रंमाक एमएच ४० सीएम ०१४२ ने स्वस्त धान्य दुकानाचा राशन वितरण वरील तांदुळ हा गोडावुन मध्ये खाली करण्याकरीता आणला आहे तसेच गोडावुन मध्ये सुध्द तांदुळाचे कट्टे सुध्दा आहे. अशा खबरेवरुन पंचासह सदर बातमीची खात्री करण्याकरीत पथक पोहचले असता त्याठिकाणी पिकअप मध्ये व गोडावुन चे आंत मध्ये स्वस्त धान्य दुकानातील शासकीय वितरणाचा तांदुळ दिसुन आल्याने कारवाई दरम्यान पुरवठा निरीक्षण अधीकारी श्रीमती शितल आंबटकर यांना घटनास्थळी बोलावुन त्यांनी पाहणी केली असता सदरचा तांदुळ हा प्रथमदर्शनी शासकिय स्वस्त धान्य दुकानातुन वितरण होणारा तांदुळ असल्याचे मत सांगुन त्याचे सॅम्पल घेण्याचे मत दिले. तांदुळाचे मालकी सांगणारे व वाहन चालक पकंज श्रावणजी बरडे रा. नेरपिंगळाई, संदिप मधुकरराव मेश्राम व चालक अक्षय अरूणराव धुर्वे यांना सदर तांदुळ वाहतुक साठवणुक याबाबतचे परवाने किंवा बिल पावती याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे जवळ कुठलाही परवाना नसल्याचे सांगितले वरुन सपोनि संतोष गुर्जर व पथकाने मिळुन आलेल्या वाहनातील व गोडावुन मधील १५५ कट्टे प्रति कट्टा अं.५०/- किलो वजनाचा एकुण वजन ७७५० कि.ग्रॅम किंमत अंदाजे २३२५००/- रू चा शासकिय स्वस्त धान्य दुकानातुन वितरण होणारा तांदुळ माल हा शितल आंबटकर पुरवठा निरीक्षण अधीकारी, तिवसा, प्रभार अमरावती यांचे ताब्यात देण्यात आला आहे. सदर पथका कडुन काढण्यात आलेल्या सॅम्पलचे अहवाल प्राप्त होताच जीवनावश्यक वस्तु अधिनियम अन्वये कायदेशीर कारवाई करण्याबाबत उपस्थीत पुरवठा निरीक्षण अधीकारी यांनी कळविले आहे. जिल्हयात अवैध व्यवसाय / काळाबाजारी तस्करी करणारे गुन्हेगार यांचे वर बारकाई लक्ष ठेवण्यात येत असुन यापूढे सुध्दा अशा प्रकारच्या कारवाई करण्याचे निर्देश निकेतन कदम पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण यांनी सर्व पोलीस घटकास दिले.

# राजापेठ अपघात प्रकरणी युवा स्वाभिमान पार्टीचे निवेदन

प्रतिनिधी ३० जुलै



**अमरावती :** राजापेठ येथे अपघातात दोन महिलांचा मृत्यू झाला. याप्रकरणी विविध मागण्या संदर्भात युवा स्वाभिमान पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस आयुक्त राकेश ओला यांना निवेदन दिले आहे. जिल्हाधिकारी यांनाही निवेदन देण्यात आले.

यामध्ये राजापेठ उड्डाण पुलावर विनानंबर प्लेट ट्रक ने हर्षा गावंडे व गौरी धर्माळे यांचा भीषण अपघातामध्ये जीव गेला. विना नंबर प्लेट ट्रक मालक व चालक यांच्यावर खुनाचा गुन्हा नोंद करावा. अपघातात मरण पावलेल्या हर्षा गावंडे व गौरी धर्माळे यांच्या कुटुंबांना प्रत्येकी २५ लक्ष रुपये आर्थिक मदत शासनाकडून देण्यात यावी.

वाहनांविरुद्ध विशेष तपासणी मोहीम राबवून प्रभावी दंडात्मक कारवाई करण्यात यावी.,संबंधित वाहनास 'नो एन्ट्री' क्षेत्रामध्ये प्रवेश कशा परिस्थितीत मिळाला, याला आरटीओ व पोलिस वाहतूक प्रशासन त्यास जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध प्रशासकीय तसेच कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

नागरिकांच्या जीवितास सर्वोच्च प्राधान्य देऊन अमरावती शहरातील वाहतूक व्यवस्थेचे प्रभावी नियोजन, नियमित निरीक्षण व कायद्याची कठोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यात यावी अशी मागणी केली. निवेदन देताना सुनील राणा , प्रकाश साबळे, सौ.सोनाली नवले, उपमहापौर सचिन भेंडे, नाना आमले , अ‍ॅड.प्रिती रेवने, प्रशांत वानखडे, सुमती ढोके, अजय जयस्वाल, किशोर जाधव, रजनी डोंगरे, गौरी मेघवानी , प्रियंका भुषण पाटने , अर्चना अशोक पांडे , योगेश विजयकर , नंदा सावदे, महेश मुलचंदानी, मिरा कांबळे, दिपक साहु, संजय हिंगासपुरे, उमेश ढोणे, नितीन बोरेकर, विनोद जायलवाल, ज्योती सैरीसे, विनोद गुहे, राजा बांगडे, आशिष गावंडे, मिलींद कहाळे, अनुप अग्रवाल, तुषार दुधे, पराग चिमोटे, बाळु इंगोले, महेश किल्लेकर, भुषण पाटने, संदीप कांबळे, राजा बांगडे, देवा शेंडे, शैलेश मेघवानी, अमोल इंगळे, सुरज मिश्रा, चंदु जावरे, उदय पर्वतकर, अविनाश काळे, पंकज सुरडकर, अश्विन उके, चंदा लांडे, अर्चना तालन, वंदना जामनेकर, लता अंबुलकर, सुनीता राऊत, निता खडसे, साक्षी उमक, शोभा किटके, किर्ती लोरे, अजय घुले, अशोक पांडे, छोटू आकोटकर, सुरज मिश्रा, अविनाश घाडगे, महेश किल्लेकर, श्याम कथे, राहुल काळे यांची उपस्थिती होती.

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजने अंतर्गत कार्यशाळा संपन्न

## प्रक्रिया उद्योगा करीता कृषि विभागा कडून 35% अनुदान

**दर्यापूर :** प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेत अंतर्गत प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी 35% अनुदान व बँक कर्ज ही योजना प्रकल्प संचालक आत्मा अमरावती अर्चना निसाने, तालुका कृषी अधिकारी कु. आरती साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

मागील वर्षात तालुक्यातील 48 प्रकल्पांना कर्ज मंजुरी मिळाली आहे. प्रकल्प मंजुरीत तालुक्याने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविला होता. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना ही असंघटित व अनोंदणीकृत अन्न प्रक्रिया उद्योगासाठी शासनाने सुरू केली असून यातून शेतीमाल उद्योगासाठी वैयक्तिक आणि गट लाभार्थ्यास 10 लाखांच्या मर्यादेत भांडवली गुंतवणुकीच्या 35 टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जात आहे. असंघटित अन्नप्रक्रिया क्षेत्रामधील संबंधित उद्योजक जे बाहेरून कर्ज घेण्यास पात्र नाहीत. वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यासाठी लागणारा जास्तीचा खर्च व मानांकनाचा अभाव असतो. यावर सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी केंद्र पुरस्कृत आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेला केंद्र शासनाने मंजुरी दिली असून. तांत्रिक ज्ञान, कौशल्याधारित प्रशिक्षण आणि इतर पायाभूत सुविधा देऊन असंघटित क्षेत्रात सूक्ष्म उद्योजकांची क्षमता बांधणी करणे, अस्तित्वातील उद्योगाच्या पतमर्यादा वाढविणे, सार्वजनिक पायाभूत सुविधा उपलब्ध करणे व एफपीओ, बचत गट, सहकारी संस्था यांना पायाभूत सोई सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. त्यासाठी प्रक्रिया सुरू झाली असून योजनेसाठी शेतकरी उत्पादक संस्था, बचतगट, सहकारी संस्था व वैयक्तिक लाभार्थी अर्ज करू शकतात. या योजनेसाठी आधारकार्ड, पॅनकार्ड, आधार व बँक खात्यास जोडला असलेला मोबाईल क्रमांक, ई-मेल, इलेक्ट्रिक बिल, मशिनचे कोटेशन, जागेचा आठ अ, जागा भाड्याने असल्यास करारनामा आदी कागदपत्रे आवश्यक आहेत.

# शहरात जड वाहनांना पूर्णपणे बंदी जिल्हाधिकारी आशिष येरेकर



प्रतिनिधी ३० जुलै

**अमरावती :** राजापेठ उड्डाणपूलावरील झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर शहरात जड वाहनांना पूर्णपणे बंद घालण्यात यावीत, तसेच शहरात जड वाहतूक प्रवेशाच्या ठिकाणी चेकपोस्ट उभाराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात शहरातील अपघाताबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांच्यासह पोलिस विभागाचे अधिकारी उपस्थित होते. राजापेठ उड्डाणपूलावरील झालेल्या अपघातानंतर जिल्हा प्रशासनाला निवेदने प्राप्त झाली आहे. त्यानुसार शहरातील अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यामुळे शहरात जड वाहने प्रवेश करीत असलेल्या ठिकाणी तपासणी करण्यात यावी. ही कार्यवाही आजपासूनच सुरू करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी दिले. शहरात सकाळी सहा ते रात्री 10 वाजेपर्यंत जड वाहतुकीस बंदी आहे.

# गांजा तस्करी करणाऱ्या दोन आरोपींना अटक; 3 लाख 30 हजाराचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ३० जुलै



**अमरावती:** गांजा तस्करी करणारे दोन आरोपी अटक ३ लाख ३० हजार रुपये किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला. आरोपी रामनाथ मंगल बेलसरे वय ४० वर्ष रा. वस्तापुर ता. चिखलदरा गणेश राजु झामरकर वय ३८ वर्ष रा. वस्तापुर ता. चिखलदरा जि. अमरावती असे नाव आहे.

निकेतन कदम, पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण यांनी ऑपरेशन कवच अंतर्गत अवैदय धंदयावर कारवाई करण्याबाबत तसेच अंमलीपदार्थ तस्करीवर कडक कारवाई करण्याचे आदेशीत केल्या नुसार आज दिनांक २९/०७/२०२५ रोजी दुपारी २.०० वा. दरम्यान सपोनि. सलीम शेख हे डी बी पथकासह पोलीस स्टेशनल परतवाडा हददीमध्ये पेट्रोलींग करीत असतांना त्यांना माहिती मिळाली की, दोन इसम मोटरसायकल क्रमांक MH 27 AY 7088 ने अंजनगांव रोडने परतवाडा कडे अंमलीपदार्थ गांजा विक्री करीता घेवून जाणार आहेत. अशा गुप्त माहिती वरुन पोस्टे परतवाडा येथे कार्यरत सपोनि. सलीम शेख व त्यांचे पथक यांनी सरकारी पंचासमक्ष अंजनगांव रोडवरील सावळी दातुरा गावाजवळील शेताजवळ जवळ पोलीस स्टाफ चे मदतीने सापळा लावून अंजनगांव कडुन परतवाडा कडे जाणारे मोटरसायकल क्रमांक MH 27 AY 7088 वरील दोन इसमांना शिताफीने ताब्यात घेतले व नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांची नावे रामनाथ मंगल बेलसरे व गणेश राजु झामरकर दोन्ही रा. वस्तापुर ता. चिखलदरा जि. अमरावती असे सांगीतले. त्यांची झडती घेतली असता त्यांचेकडे एका पांढ-या रंगाचे नायलॉन कट्यामध्ये मध्ये गांजा असल्याचे निदर्शनास आल्याने सविस्तर पंचनामा करुन आरोपीतांचे ताब्यातून ५किलो गांजा (अंमलीपदार्थ) किंमत २५०००/- रुपये व हिरो कंपनीची स्प्लेन्डर मोटर सायकल किंमत ८००००/- मोटर सायकल असा एकुण ३ लाख ३० हजार रुपये किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे व सदर मुददेमाल सरकारी पंचासमक्ष जप्त करण्यात आला. आरोपीवर NDPS Act अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन दोन्ही आरोपीना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास सुरु आहे. सदर कार्यवाही पोलीस अधिक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोडेवाड, . उपविभागीय पोलीस अधिकारी धारणी प्रभार अचलपुर . माधवराव गरुड, स्था.गु.शा. पोलीस निरीक्षक अशोक लांडे स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीण, पोलीस निरीक्षक अजय आकरे ठाणेदार पोलीस स्टेशन परतवाडा यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. सलीम शेख, पो.हे.कॉ. सचिन होले, पो.हे.कॉ. सुधिर राउत, पो.कॉ. शुभम शर्मा, पो.कॉ. चंदु वानखडे, पो.कॉ. सचिन कोकणे, पो.कॉ. घनश्याम किरोले, पो.कॉ. जितेश बाबील यांनी केली.

## मध्यवर्ती कारागृहात कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर

**अमरावती :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे अमरावती मध्यवर्ती कारागृहात कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर पार पडले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांनी कारागृहातील बंद्यांना प्ली बार्गेनिंग म्हजेच शिक्षा किंवा आरोप कमी करून घेण्यासाठी आरोपीने न्यायालयात अथवा फिर्यादीसोबत केलेला गुन्हा कबूल करण्याचा करार, वाटाघाटी करण्याच्या प्रक्रियेबद्दल मार्गदर्शन केले. न्यायरक्षक कार्यालयाचे मुख्य अधिवक्ता अ‍ॅड. जितेंद्र देशमुख यांनी उपस्थितांना कायदेविषयक विविध हक्क आणि स्पृहा योजनेबद्दल मार्गदर्शन केले. कारागृह उपअधिक्षक प्रदिप इंगळे यांनी प्रास्ताविक केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार, दि. ३० जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




सुपरफास्ट मंगळवार, दि. ११ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
लेमन सोडा बाटलीवर नाही एक्सपायरी डेट, कारवाई करा थेट!
शेलुबाजार येथील अक्षम्य प्रकार, अन्न व औषध प्रशासन काय कारवाई करणार?
बुधवार, दि. २२ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
पॅकिंगवर नाही उत्पादन तिथी, ग्राहकांच्या आरोग्याची माती!
गुरूवार, दि. २३ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
नियम-कायदा धाब्यावर, लेमन सोडा देशी दारूच्या गुत्यावर!
शेलुबाजार येथील 'त्या' लेमन सोड्याची विक्री सुरूच...
गुरूवार, दि. २४ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
नियमांची होतंय पायमल्ली, प्रशासनाची उडवली खिल्ली!
सोमवार, दि. २७ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
नाही उत्पादन तिथी, मग एक्सपायरी कधी...
लेमन सोडा ठरतोय घातक, प्रशासनाला नाही सोयरसुतक!
मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
घातक लेमन सोडा, कारवाईतून शिकवा धडा!

# नाही उत्पादन तिथी, मग एक्सपायरी कधी,
# कारवाईची नाही धास्ती, उतरवा मस्ती !
## अन्न व औषध प्रशासनाची कारवाई कमी, अन् वसुली जास्ती


● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील शेलुबाजार येथे उत्पादीत होणारा कथित लेमन सोडा प्रकरण आता 'शाही' थाटात गाजत आहे. कारण या उत्पादन कंपनीचा मालक कुणीतरी 'शहा' असल्याने अन्न व औषध प्रशासन विभाग झोपेचे सोंग घेऊन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. परिणामी बाजारात विकल्या जात असलेल्या बाटलीवर उत्पादन तारीखच नाही, तर एक्सपायरी कधी ? हा कळीचा मुद्दा उपस्थित होत आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे. तरीही सबंधित प्रशासनाला याचे काहीही सोयरसूतक नाही असे अपरोधाने लोकं बोलत आहेत.

शेलुबाजार येथील STRESSCURE सॉफ्ट ड्रिंक्स अँड मिनरल वॉटर प्रा.ली. कंपनीच्या लेमन सोडा बाटलीवर उत्पादन तारीख, बॅच नंबर आणि किरकोळ विक्री किंमत नसल्याचे उघड झाले आहे. सदर लेमन सोड्याच्या बाटलीवर ' SEE BOTTLER




NECK/CAP असा उल्लेख आहे, मात्र त्या ठिकाणीही कोणतीही माहिती छापलेली नाही.' Best Before 3 Months from the date of mfg ' असं लिहिलं असलं तरी उत्पादन तारीखच नसल्याने एक्सपायरी कधी हे ग्राहकांना कळणार कसं ? हा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. या बाबत सिटीन्यूज सुपरफास्टने सातत्याने पाठपुरावा केला आहे. मात्र अन्न व औषध प्रशासन विभाग वाशिम या गंभीर प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत




**शेलुबाजार वासियांचा सवाल**

असल्याचा आरोप सर्व सामान्य नागरिक करत असून कुठतरी पाणी मुरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यानिमित्ताने अन्न सुरक्षा नियमांनुसार उत्पादन तारीख, बॅच नंबर बंधनकारक असताना अन्न व औषध प्रशासन विभाग वाशिम का गप्प आहे. हा कळीचा मुद्दा उपस्थित होत आहे. मात्र माफीयांना कारवाईची धास्ती नसल्याने अधिकाऱ्यांनी त्यांची मस्ती उतरविण्याची गरज आहे

### प्रशासनाला नाही ताळमेळ, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ...

अन्न सुरक्षा नियमांनुसार कोणत्याही खाद्य पदार्थांच्या पॅकिंगजवर तसेच कुठल्याही पेयाच्या बाटलीवर उत्पादन तारीख, बॅच नंबर लिहिणे बंधनकारक आहे. या नियमाचे काटेकोर पालन करणे हे सबंधित कंपनीचे आद्य कर्तव्य आहे. मात्र शेलुबाजार येथे उत्पादीत होणाऱ्या कथित लेमन सोड्याच्या बाटल्यांवर सदर माहिती आढळत नाही. परिणामी एक्सपायरी बद्दल सविस्तर माहितीच नसल्याने जुना स्टॉक विकला जातोय का हे पाहणे खुप गरजेचे आहे. पण सबंधित प्रशासनाच्या अर्थपूर्ण संबंधातून या गंभीर प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष तर केले जात नाही ना ! हे पाहणे सुद्धा तितकेच महत्वाचे आहे. अन्यथा ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ सर्रास सुरू राहणार आहे.

---

## थोडक्यात

### गुरुपूजन व गुरूबंधन कार्यक्रमातून गुरु-शिष्य परंपरेचा जागर



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर ज्ञानकाशी इंग्लिश स्कूलमध्ये गुरुपूजन तथा गुरूबंधन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानकाशी इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका तथा संचालिका चंचल खिराडे यांनी विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना साठी शिक्षिका दिपाली घोटकर, संजिवनी मानवतकर, सुनिता घाटे, कोमल दवे, वैष्णवी येवले, तन्वी संघवी तसेच शिक्षक अमोल शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी सुनिता वाघमारे, कल्पना पाटील, चंदा ठाकूर आणि चंचला पाटील या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

### कुत्र्याच्या पायावरील गाठीवर यशस्वी शस्त्रक्रिया, ३०० ग्रॅमची गाठ काढण्यात डॉक्टरांना यश !



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम, शेतकरी सुनील लोणसूने यांच्या कुत्र्याच्या पायावरील गाठीची कठीण अशी यशस्वी शस्त्रक्रिया पशुवैद्यकीय डॉक्टरांनी केली.दि. २८ जानेवारी २०२८ : जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, वाशीम येथ शेतकरी सुनील लोणसूने यांच्या कुत्र्याच्या पायावरील लिपोमा (चरबीची गाठ) यावर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेद्वारे सुमारे ३०० ग्रॅम वजनाची गाठ सुरक्षितपणे काढण्यात आली.

**जनावरांच्या आजारासाठी संपर्क साधण्याचे पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांचे आवाहन**

ही शस्त्रक्रिया डॉ. योगीराज वंजारी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ. शेख नुरमहमद, पशुविकास अधिकारी सुजक मते, अजय भोवडे, शंकर गोटे या टिमने सहकार्य केले. पशु वैद्यकीय डॉक्टरांनी ३०० ग्रामचे कॅन्सरट्युमर काढल्यामुळे कुत्र्याला पुर्णजीवन मिळाले. शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर संबंधित जनावराची प्रकृती स्थिर असून त्यावर आवश्यक उपचार सुरू आहेत.

जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तत्परतेमुळे ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्याने पशुपालकांनी समाधान व्यक्त केले.जनावरांमध्ये अशा प्रकारच्या गाठी दिसून आल्यास दुर्लक्ष न करता तातडीने पशुवैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन पशुवैद्यकीय विभागाने केले आहे.

---

## केनवड येथे अप्पर तहसील का आवश्यक...
# तहसीलच्या कामासाठी येतील, सोबत दहा कामे करून जातील !

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

रिसोड तालुक्याच्या शेवटच्या टोकावरील केनवड परिसरातील नागरिकांना महसूल विभागाच्या विविध कामांसाठी आजही सुमारे ४० किलोमीटरचा प्रवास करून तहसील कार्यालय गाठावे लागते. त्यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत आहे. अशा परिस्थितीत अप्पर तहसील कार्यालय केनवड येथे सुरू झाल्यास परिसरातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. तहसीलच्या कामासाठी केनवडला येणाऱ्या नागरिकांना त्याचवेळी इतर आवश्यक शासकीय व दैनंदिन कामेही पूर्ण करता येतील. त्यामुळे 'तहसीलच्या कामासाठी येतील आणि सोबत दहा कामे करून जातील', अशी परिस्थिती निर्माण होऊन नागरिकांचा वेळ आणि

### त्यामुळे नागरिकांचा वेळ व पैसा दोन्ही वाचतील




सुपरफास्ट बुधवार, दि. २९ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
सुविधांचा निकष की राजकीय आग्रह !
केनवडमध्ये सर्व सुविधा, तरीही अप्पर तहसील कार्यालयावर आक्षेप का? आजपासून साखळी उपोषण

पैसा दोन्ही वाचणार आहेत.

केनवड हे परिसरातील मध्यवर्ती ठिकाण असून येथे प्राथमिक आरोग्य केंद्र, शाळा-महाविद्यालये, राष्ट्रीय महामार्ग, बसस्थानक, मोठी बाजारपेठ, राष्ट्रीयीकृत बँका, विद्युत उपकेंद्र तसेच इतर सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे प्रशासकीय कार्यालय चालविण्यासाठी केनवड हे सर्वार्थाने सक्षम ठिकाण असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. याच ठिकाणी विविध शासकीय व दैनंदिन आवश्यक सेवा उपलब्ध असल्यामुळे नागरिक व शेतकरी तहसीलच्या कामासोबतच बँकेची कामे, आरोग्यविषयक कामे, बाजारपेठेतील खरेदी-विक्री तसेच इतर आवश्यक शासकीय कामेही एकाच दिवशी पूर्ण करू शकतील. तहसीलदार केनवड येथे नियमितपणे आल्यास महसुली कामेही तातडीने मार्गी लागतील. त्यामुळे नागरिक व शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम यांची मोठी बचत होऊन त्यांना वारंवार दूरचा प्रवास करण्याची गरज भासणार नाही. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, 'अप्पर तहसील कार्यालय केनवड येथे झाल्यास तहसीलदार नियमितपणे येथे येतील आणि एका भेटीत परिसरातील नागरिकांची अनेक महसुली कामे मार्गी लागतील. सात-बारा, फेरफार, वारस नोंद, उत्पन्न, जात, अधिवास यांसह विविध महसुली कामांसाठी रिसोडला वारंवार जावे लागणार नाही.' नागरिकांनी शासनाला आवाहन केले आहे की, अप्पर तहसील कार्यालयाच्या मुख्यालयाबाबतचा निर्णय राजकीय आग्रह किंवा दबावावर नव्हे, तर उपलब्ध सुविधा, भौगोलिक गरज आणि जनहित या निकषांवर घेण्यात यावा.

### केनवडमध्ये साखळी उपोषणाचा एल्गार; महिला-युवतींचा उत्स्फूर्त सहभाग

प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय केनवडमध्येच कायम ठेवण्याच्या मागणीसाठी कालपासून केनवड येथे साखळी उपोषणाला सुरुवात झाली आहे. आज उपोषणाचा दुसरा दिवस असून नागरिक, शेतकरी, व्यापारी यांच्यासह महिला व युवतींचाही उत्स्फूर्त सहभाग आंदोलनात पाहायला मिळत आहे. मोठ्या संख्येने महिला व युवती उपोषणस्थळी उपस्थित राहून आंदोलनाला पाठिंबा देत आहेत. 'राजकीय आग्रह नव्हे, तर उपलब्ध सुविधा आणि जनहिताच्या निकषावरच निर्णय घ्यावा,' अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे. महिला व युवतींच्या सक्रिय सहभागामुळे आंदोलनाला अधिक बळ मिळाल्याचे चित्र दिसून येत आहे.

---

## जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी
# वकार मोसीन विरोधात गुन्हा दाखल!

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड शहरातील पठाणपुरा भागातील रमीज खान अकबर खान यांना शिवीगाळ करून जीवाने मारून टाकण्याची धमकी दिल्याप्रकरणी वकार मोसीन कबीर मोसीन यांचेविरूद्ध रिसोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारकर्ते रमीज खान अकबर खान १२ जुलै २०२६ रोजी सकाळी ८ वाजता रिसोड शहरातील मोमीनपुरा चौकात उभे होते.त्याचवेळी वकार मोसीन कबीर मोसीन यांनी रमीज खान यांना तु आमच्या विरोधात केलेल्या सर्व तक्रारी मागे घे असे म्हटले.तेव्हा रमीज खान यांनी तक्रारी मागे घेण्यास नकार दिला. तेव्हा वकार मोसीन यांनी रमीज खान यांना शिवीगाळ करून एका दिवशी तुला

### रमीज खान यांना वकार मोसीन कडून शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी

जीवाने मारून टाकण्याची धमकी दिली. अशी तक्रार मजुरीचे काम करणाऱ्या रमीज खान अकबर खान यांनी रिसोड पोलीस ठाण्यात दिली.या घटनेचे गांभीर्य पाहून रिसोड पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी १२ जुलै रोजी आरोपी वकार मोसीन कबीर मोसीन यांचेविरूद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २९६ आणि कलम ३५१ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.या प्रकरणाचा तपास ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार महादेव चौहाण करत आहेत.

---

## सिंधी कॅम्प येथील अनाधिकृत बांधकामावर होणार कारवाई
# २४ तासात अनाधिकृत बांधकाम काढण्याचे आदेश !

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा येथील सिंधी कॅम्प मधील अनधिकृत बांधकाम पाडण्याची नोटीस नगर परिषद कारंजा ने दिली आहे.

सविस्तर माहिती असे की, सिंधी कॅम्प येथील नझूल सीट नंबर १० डी.प्लॉट नंबर ६१ वर संदीप पंजवानी यांनी अनधिकृत बांधकाम केल्याची तक्रार नरेंद्र गाढवे यांनी नगरपरिषेकडे केली होती.त्या अनुषंगाने नगरपरिषद कारंजा यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ अंतर्गत,(कलम १५२ सह) नियोजन प्राधिकरणाचे

### नोटीस दिल्यानंतरही अनधिकृत बांधकाम सुरूच

अधिकार व कार्य वापरण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे.आणि ज्याअर्थी, खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे उक्त अधिनियमानुसार आवश्यक असलेले बांधकाम करणेकरिता परवानगी घेणे आवश्यक आहे.परंतु आपण शासकीय नझुल शिट नं. १०-डी, भुखंड क्र.६१ वर विनापरवानगी बांधकाम केले आहे.त्याअर्थी,ही नोटीस आपणांस खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येत आहे.१) सदरहू इमारतीचे खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेले, आपण केलेले बांधकाम पाडुन टाकावे.२)आपण उपरोक्त आदेशाचे पालन न केल्यास,उक्त अधिनियमाअंतर्गत केलेले विनापरवानगी बांधकाम २४ तासांच्या आत काढून घ्याचे अन्यथा ते नगर परिषदेमार्फत काढण्यात येईल व काढून घेणेकरिता येणारा खर्च आपल्याकडून वसुल करण्यात येईल.त्यास आपण स्वतः व्यक्तीशः जबाबदार राहाल. अशा प्रकारची नोटीस नगर परिषद कारंजा यांनी अवैद्य बांधकाम करणाऱ्यांना दिली आहे.



---

## गंभीर आरोप असलेले गुन्हेगार,
# शहरातून व्हावे तडीपार!
### पोलीस प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, नागरिकांची मागणी

● खाजा शेख @ रिसोड ●

शहरात काही गंभीर आरोप असलेले गुन्हेगार कायदा आणि पोलीस प्रशासन आमचे काहीही वाकडे करू शकत नाही. या आविर्भावात ताठ मानेने वावरत आहेत. त्यात काही ' पांढरपेशी ' गुन्हेगारांचाही समावेश असून असे गुन्हेगार कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कधीही घातक ठरू शकतात. अशा गुन्हेगारांची यादी बनवून त्यांना शहरातून तडीपार करण्यात यावे अशी मागणी सुज्ञ नागरिकांकडून केली जात आहे.

रिसोड शहरात काही आरोपी खूप गंभीर गुण्यातील गुन्हेगार आहेत जे खुलेआम गावात फिरताना दिसतात त्यांच्यावर ३०२ खून करणे, पैशाचा पाऊस पाडण्याचे लोभ देणे, पोलिसांची बनावट वर्दी घालून लोकांना रस्त्यावर पोलीस आहे म्हणून भासविणे व लुबाडणे अशा प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल असून सुद्धा हे आरोपी राजरोसपणे पांढऱ्या कपड्यात शहरात वावरताना दिसतात अशा लोकांपासून समाजाला भविष्यात निश्चित त्रासदायक व कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची कारण ठरू शकतात. त्यामुळे



पोलिसांनी अशा लोकांची यादी बनवून त्यांच्यावर असलेल्या गुन्ह्याचे स्वरूप पाहून त्यांना तात्काळ तडीपार करणे गरजेचे आहे. असे समाज संकट समाजासाठी कधीही घातक ठरू शकतात परंतु पोलीस यंत्रणा अशा कामात निष्क्रिय ठरत असून अशा गंभीर गुन्हेगारांना राजरोस फिरण्यास व पुन्हा गुन्हा करण्यास मोकळीक मिळत आहे. ज्या लोकांवर अनेक गुन्ह्याचे नोंद आहे अशा व्यक्तींना तात्काळ कार्यवाही करून वरिष्ठाकडे तडीपारच्या आदेशाकरिता रिसोड पोलीस स्टेशन ने पाठवणे गरजेचे आहे परंतु प्रशासनाने ह्याकडे दुर्लक्ष केल्यास पुन्हा हे आरोपी नवीन गुन्हा घडवण्याची रचना आखू शकतात. ज्या लोकांवर दोन पेक्षा अधिक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहे .अशा लोकांची माहितीच्या अधिकारात माहिती. मागून ती वरिष्ठांकडे पाठवण्याकरिता एक समाजसेवक अर्ज करणार आहे. जरी त्यांचे गंभीर गुण्या संदर्भातील प्रकरणे न्यायप्रविष्ठ असले तरीसुद्धा ते समाजासाठी घातक नुकसानदायक आहे हे पोलीस प्रशासन जाणून घेऊन त्यांच्या बाबतीत त्वरित तडीपारची कार्यवाही करावी अशी जनतेची मागणी आहे.

---

## अनसिंग येथे काटेकर विद्यालयाची वृक्षदिंडी !

**विद्यार्थ्यांनी केला वृक्षारोपणाचा जागर...**






● सिटी न्युज ब्युरो @ अनसिंग ●

तालुक्यातील अनसिंग येथील हौसाजी काटेकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वृक्षदिंडी काढून नागरिकांना वृक्षारोपणाचे महत्व पटवून दिले.वाढते तापमान, जमीनीची धूप आणि प्रदुषणावर मात करण्यासाठी अनसिंग येथील हौसाजी काटेकर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची नुकतीच गावामध्ये वृक्षदिंडी काढण्यात आली.या वृक्षदिंडीचा प्रारंभ काटेकर विद्यालया पासून करण्यात आला.

विद्यालया पासून निघालेली वृक्षदिंडी गजानन महाराज मंदिर,नागनाथ चौक, गांधी चौकातून मुख्य मार्गाने मार्गस्थ होवून जुने बस स्थानक,सरकारी दवाखाना,खडसिंग चौफुली ,बाजार समिती परिसरातून काढण्यात आली.

धर्मवीर संभाजी महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रामेश्वर काटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले.शाळेतील विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाचे महत्व पटवून देण्यासाठी शाळा समितीच्या अध्यक्ष ज्योती काटेकर,मुख्याध्यापक शिवानी वाघमारे (काटेकर),सहाय्यक शिक्षीका भटकर,सहाय्यक शिक्षक योगेश लांडगे, शरद गोटे,संजय तांबारे, देवानंद काटेकर,गणेश काकडे यांनी पुढाकार घेतला.वृक्षदिंडीची सांगता शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करून करण्यात आली. वृक्षदिंडीच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सेवक रामप्रसाद खंडारे,खाडे यांनी परिश्रम घेतले.

# गुरुपौर्णिमेनिमित्त शेगावी हजारो भाविक भक्तांनी घेतले श्रींचे दर्शन

प्रतिनिधी ३० जुलै



**शेगाव:** गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुदेवो महेश्वरा | गुरु साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः || गण गण गणात बोते गुरु गजानन नमो नमः | माऊली ओ माऊली गुरु गजानन माऊली ||

गुरुपौर्णिमा निमित्त संतनगरी शेगाव येथे आज २९ जुलै रोजी गुरुपौर्णिमा तिथीला राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या हजारो भाविकांनी श्री संत गजानन महाराज मंदिरात श्रींचे मनोभावे दर्शन घेतले. हिंदू धर्मियांमध्ये धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या गुरुपौर्णिमा तिथीला गुरुची आराधना करण्यात येते श्री संत गजानन महाराजांना गुरु मानणाऱ्या हजारो भाविकांनी आज बुधवार दि. २९ जुलै रोजी श्री संत गजानन महाराज मंदिरात श्रींच्या चरणी नतमस्तक झाले. गुरुपौर्णिमेच्या दिवशी आराध्य दैवत असलेल्या श्री संत गजानन महाराजांच्या चरणी नतमस्तक होण्याकरिता हजारो भाविक शेकडो किलोमीटर अंतर पायी चालून श्रींच्या मंदिरात पोहोचले होते. श्री संत गजानन महाराज मंदिर संस्थानच्यावतीने भाविकांच्या दर्शनासाठी मंदिर परिसरामध्ये भक्तांच्या सेवेसाठी शेकडो सेवाधारी सेवा देत आहे. श्री गुरु पौर्णिमेनिमित्त श्रींच्या दर्शना करिता मंदिरात आलेल्या शेकडोभाविकांनी श्रींच्या गादीजवळ श्रींच्या स्त्रोतांचे पठन व पारायण हॉलमध्ये बसून श्री दास गणू महाराज लिखित श्री गजानन विजय ग्रंथाच्या २१ अध्यायाचे मनोभावे पारायण केले.

नामस्मरण गजाननाचे गण गण गणात बोते |

अखंड चिंतन गजाननाचे गण गण गणात बोते ||

गुरुपौर्णिमेनिमित्त शेगाव येथे श्री संत गजानन महाराजांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती .

राज्यातील भाविक श्री गजानन महाराजांच्या दर्शनासाठी येतात व आपली इच्छा श्री गजानन महाराज चरणी प्रगट करतात. श्री गजानन महाराजांना आपले गुरू मानून त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी भाविक शेगावला येत असतात. त्यामुळे संतनगरी शेगावला भक्तिमय असे स्वरूप येऊन भाविकांची मांदियाळी निर्माण होते. परिसरातील गुरुपौर्णिमेनिमित्त गुरु प्रतिकृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पायी वारी करत दिंड्या शेगावकडे टाळ मृदुंगाच्या गजरात व हरिनामाच्या जय घोषात व गण गण गणात बोते मंत्राचा नाम जप करत येत असतात ठिक ठिकाणाहून पायी दिंडी गुरुपौर्णिमेच्या दिवशी शेगावात दाखल होत असते. संपूर्ण देशात साजरा होत असलेल्या गुरुपौर्णिमा उत्सव हा एक अलौकिक क्षण असून गुरूला फार महत्त्व असल्याने शेगावला पायी वारी करणारे ची संख्या सुद्धा मोठ्या प्रमाणात पाहण्यास मिळते. श्री गजानन महाराज संस्थानमध्ये गुरुपौर्णिमेनिमित्त पहाटे पासून भक्तांची मांदियाळी 'श्रीं'च्या दर्शनासाठी होत असते. २९जुलै बुधवार रोजी गुरुपौर्णिमा उत्सव भक्तीपूर्ण वातावरणात पार पडलाआहे. तर श्रींच्या मंदिरात दुपारी ४ ते ५ प्रवचन झाले. श्रीं'च्या प्रति आपली गुरु भक्ती अर्पण करण्यासाठी 'श्रीं'ना ज्या भक्तांनी गुरुस्थानी मानले ते भक्त गुरूंचा आशीर्वाद घेण्यासाठी आपली भक्ती अर्पण करण्यासाठी पहाटेपासून 'श्रीं'च्या समाधी दर्शनासाठी येतात. श्री गजानन महाराज संस्थानच्यावतीने नियोजनपूर्व व्यवस्था नित्याप्रमाणे करण्यात आली होती. तर मलकापूर येथील दोन हजार भाविकांनी गुरुपौर्णिमा निमित्ताने पायदळ वारीत सहभागी होऊन आज बुधवारी रोजी भाविक' गण गण गणात बोते 'चा मंत्रोच्चार,टाळ मृदुंगाच्या गजर,करीत भाविक सहभागी झाले होते. गुरुपौर्णिमेनिमित्त मलकापूर ते शेगाव दिंडीचे यावर्षी १८ वर्ष होते. गेली १७वर्षे नियमितपणे वारी करत आहेत.

> » गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने राज्यातील भाविक आपआपल्या गुरुच्या दर्शनसाठी विविध धार्मिक ठिकाणी जातात त्यातील शिर्डी येथील श्री साँईबाबा, कारंजा येथील श्री दत्त मंदिर, अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ तर शेगांव येथील श्री गजानन महाराज यांचे दर्शन घेतात. या सर्व ठिकाणी भाविकांनी दर्शनासाठी गर्दी दिसत आहे.

# खामगाव तेली समाजाच्या वतीने तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

प्रतिनिधी ३० जुलै




**खामगाव :** दि २६ ७ २०२६ रोजी दु १ वाजता श्री संताजी महाराज सभागृह सिव्हिल लाईन भिसे प्लॉट येथे तेली समाज खामगाव च्या वतीने खामगाव तालुक्यातिल तेली समाज गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाचे (अध्यक्ष) सौ नंदाताई सोनटक्के व खामगाव तेली समाज पंचमंडळा चे (अध्यक्ष) श्री अरुणभाऊ आकोटकार प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या डॉ मोनिकाताई उमक मार्गदर्शक म्हणून लाभलेले श्री संदीपजी विचे (निरीक्षक गव्हर्नमेंट आयटीआय खामगाव) श्री राजेशजी धानोरकार सर (जिल्हा परिषद शाळा लांजुळ) सत्कारमूर्ती श्री राजेशजी गोमासे साहेब उपनिरीक्षक पोलीस बुलढाणा जिल्हा बत्तीस वर्षे सर्विस करून सेवानिवृत्त झाल्याबद्दल समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला तसेच श्री अनंत निळे (स्वच्छता निरीक्षक ग्रुप बी) मधून सेवानिवृत्त झाले त्याबद्दल समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चनाताई जामोदे यांनी केले तर कार्यक्रम चे प्रास्ताविक सौ रेखाताई राऊत यांनी सादर केले तसेच प्रा डॉ मोनिकाताई उमक शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांची महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा विदर्भ अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही पुष्पगुच्छ व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला तसेच श्री संदीपजी विचे व राजेशजी धानोरकर सर यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच मोनिकाताईंनी विद्यार्थ्यांना अध्यात्माचे अधिष्ठान ठेवून करिअर संबंधित मार्गदर्शन केले व ज्या धर्मात जातीत आपण जन्माला येतो त्याचं ऋण फेडले गेले पाहिजे त्याचे ऋण फेडण्याचा विद्यार्थ्यांना आव्हान केले

तसेच एक तडफदार व्यक्तिमत्व असलेले श्री जयेशभाऊ रमेशजी भिसे यांची महाराष्ट्र प्रांतिक तेली महासभा अकोला युवा विभागीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही शाल व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला तसेच २०२५ २६ च्या बी ए एम एस च्या परीक्षेमध्ये नेत्र दीपक यश संपादन केल्याबद्दल कु गुंजन गजानन चोपडे यांचे ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला तसेच २०२५ २६ च्या एलएलबी ची परीक्षा प्रथम क्रमांक उत्तीर्ण झाल्याबद्दल अँड प्राची सुनील खोपाले यांचा ट्रॉफी देऊन समान करण्यात आला तसेच दरवर्षीप्रमाणे स्व सौ तुळसाबाई राजाभाऊ चोपडे व स्वर राजाभाऊ पुंडलिक चोपडे यांच्या स्मृती स्मुर्ती प्रित्यर्थ त्यांचा मुलगा श्री विजयजी चोपडे सर यांच्यावतीने खामगाव तालुका तेली समाज यामध्ये दहावी बारावी मध्ये प्रथम द्वितीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी व पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले तर यावर्षी खामगाव तालुका तेली समाज मधून बारावी मध्ये प्रथम क्रमांक मिळवलेल्या स्नेहल उमेश राऊत (द्वितीय क्रमांक) तन्वी विलास भागवत दहावी मध्ये (प्रथम क्रमांक) मिळवलेले विराज सुनील थोटांगे व (द्वितीय क्रमांक) गौरी संजय खेडकर यांनी पटकावलेले आहेत कायक्रमाचे आभार प्रदर्शन अविनाश सोनटक्के यांनी केले तसेच कार्यक्रमांमध्ये पंचमंडळाचे अध्यक्ष अरुण भाऊ आकोटकर सोपानभाऊ चोपडे पंकजभाऊ गमे शितल भाऊ राठोड गोपाल भाऊ खेडकर गोपाल भाऊ बोरे प्रा सुनीलजी जामोदे सर सुनील जी फंडात सर अमोल भाऊ राठोड विशेष सहकार्य लागले यांचे तसेच कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी जयेश भाऊ भिसे शेखरजी गोतमारे निळकंठ भाऊ सोनटक्के रमेश भाऊ भागवत दीपक महाकाले प्रतिभाताई सोनटक्के विमलताई बोरे सुलोचनाताई सुलताने अंजलीताई सोनटक्के संजनाताई जामोदे स्मिताताई भिसे नयनाताई पांडव पुष्पाताई जावरे उर्मिलाताई बेलोकार शारदाताई गलवाडे राधिकाताई गोतमारे शारदाताई खेडेकर रूपालीताई गोतमारे अमृताताई चौधरी शितलताई खापट वैशालीताई जुमडे राधिकाताई बोरे रेखाताई राऊत ॲड आशाताई भागवत गौरीताई भिसे प्रीतिताई अकोटकार प्रगती ताई सोनटक्के रश्मीताई गलवाडे दीप्तीताई नायसे यांनी अथक परिश्रम घेतले आदी संख्येने विद्यार्थी पालक व समाज बंधू भगिनी उपस्थित होत्या

# रात्रीच्या वेळी संशयास्पद रित्या वावरणाऱ्या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी ३० जुलै

**मलकापूर : शहरातील आठवडी बाजार परिसरात रात्रीच्या वेळी चेहऱ्यावर रुमाल बांधून संशयास्पदरीत्या वावर करणाऱ्या एका युवकाविरुद्ध मलकापूर शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**

**मिळालेल्या माहितीनुसार, बुधवार (दि. २९) रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास आठवडी बाजार परिसरात गस्तीदरम्यान शेख साबीर शेख अहमद (वय ३३, रा. सायकलपुरा, ता. मलकापूर, जि. बुलढाणा) हा इसम संशयास्पद अवस्थेत आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चेहऱ्यावरील रुमाल काढत चौकशी केली. चेहरा झाकून अंधारात लपून बसण्याबाबत विचारणा केली असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. एखादा दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने सूर्यास्तानंतर संशयास्पद स्थितीत वावरत असल्याचा संशय आल्याने त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला.**

**या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल योगेश प्रभाकर तायडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्यातील कलम १२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (रस्ढ्ढ) निंबाळकर करीत आहेत.**

# दोन महिन्यांपासून महाडीबीटी पोर्टल ठप्प; विद्यार्थी अडचणीत

## प्रवेश प्रक्रियेला फटका; विद्यार्थ्यांकडून तक्रार

प्रतिनिधी ३० जुलै

**खामगाव :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या महाडीबीटी पोर्टलला मागील दोन महिन्यांपासून बंद असल्याने शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अधांतरी आहे. शिष्यवृत्ती वितरणाची प्रक्रिया ठप्प झाली असून, नव्या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रियेवर त्याचा परिणाम होत आहे.

अनेक महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून संपूर्ण शिक्षण शुल्क, विकास शुल्क आणि इतर शुल्काची वसुली करत असल्याची तक्रार विद्यार्थ्यांकडून केली जात आहे.

सामाजिक न्याय विभागामार्फत महाडीबीटी पोर्टलद्वारे शिष्यवृत्तीची रक्कम थेट विद्यार्थी आणि महाविद्यालयांच्या खात्यात जमा केली जाते. केंद्र शासनाचा ६० टक्के हिस्सा विद्यार्थ्यांच्या खात्यात, तर राज्य शासनाचा ४० टक्के निधी संबंधित लाभार्थी आणि महाविद्यालयांना वितरित केला जात; मात्र पोर्टल बंद असल्याने अर्ज, पडताळणी आणि निधी वितरणाची प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली आहे.

**शुल्क भरण्याचा ताण**

महाडीबीटी पोर्टल बंद असल्यामुळे शिष्यवृत्तीची रक्कम वेळेत मिळत नसल्याने अनेक महाविद्यालयांकडून पूर्ण शुल्क भरण्याची अट घातली जात आहे.

**निर्वाह भत्त्याबाबत संभ्रम**

महाडीबीटी पोर्टल बंद असल्याने विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये व्हाऊचर कॅल्क्युलेशनची माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होणाऱ्या ६० टक्के निधीपैकी नेमका किती हिस्सा निर्वाह भत्त्याचा आहे, हे समजत नाही. या संभ्रमाचा गैरफायदा घेत काही महाविद्यालये विद्यार्थ्यांना संपूर्ण रक्कम जमा करण्यास सांगत असल्याचा आरोप विद्यार्थी संघटनांनी केला आहे.

**महाविद्यालयांनी कागदपत्रे अडवल्याची तक्रार**

शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली नसल्याचे कारण देत काही महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे आणि कागदपत्रे परत न दिल्याची तक्रार आहे. त्यामुळे पुढील प्रवेश, शैक्षणिक पडताळणी किंवा महाविद्यालय बदलण्याच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**तातडीने पोर्टल सुरू करण्याची मागणी**

विद्यार्थी, पालक आणि विद्यार्थी संघटनांनी सामाजिक न्याय विभागाकडे महाडीबीटी पोर्टल तातडीने सुरू करून प्रलंबित अर्ज निकाली काढावेत, शिष्यवृत्तीचे वितरण गतीने करावे आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या देयकांची संपूर्ण माहिती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे.

# रनथम येथे गावठी दारूसह एकावर कारवाई; 9 लिटर दारू जप्त

प्रतिनिधी ३० जुलै

**मलकापूर :** एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे रनथम येथे धाड टाकून गावठी हातभट्टी दारू बाळगणाऱ्या एका व्यक्तीवर कारवाई केली. या कारवाईत सुमारे ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि. २८) सायंकाळी ५ ते ५.४० वाजताच्या दरम्यान रनथम येथील गेंदालाल महेंगे यांच्या घरासमोरील सार्वजनिक रस्त्यालगत छापा टाकण्यात आला. यावेळी गेंदालाल बिसन मेहेगे (वय ४८, रा. रनथम, ता. मलकापूर) याच्या ताब्यात १० लिटर क्षमतेच्या प्लास्टिक कॅनमध्ये ९ लिटर गावठी हातभट्टी दारू आढळून आली. सदर दारूची किंमत ९०० रुपये असून प्लास्टिक कॅनसह एकूण ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त दारूपैकी १५० मिलीचा नमुना रासायनिक विश्लेषणासाठी (सी.ए.) सीलबंद करून ठेवण्यात आला, तर उर्वरित दारू नियमानुसार घटनास्थळी नष्ट करण्यात आली.

याप्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा क्रमांक ९८/२०२६, कलम ६५(ई) अन्वये एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई हेड कॉन्स्टेबल संदीप रमेश पवार यांनी केली असून पुढील तपासही तेच करीत आहेत.

# 21 वर्षीय युवतीची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी ३० जुलै

**मलकापूर :** तालुक्यातील बहापुरा येथे २१ वर्षीय तरुणीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (दि. २९) दुपारी घडली. या प्रकरणी मलकापूर शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. मृत युवतीचे नाव सुजाता वामन इगळे (वय २१, रा. बहापुरा, ता. मलकापूर) असे आहे. याप्रकरणी तिचा चुलत भाऊ रूपेश आत्माराम इगळे यांनी पोलिसांत माहिती दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २९ जुलै रोजी दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास सुजाता इगळे हिने घराच्या मागील खोलीतील लोखंडी पाइपला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेतला. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी तातडीने गळफास कापून तिला खाली उतरविले व उपचारासाठी मलकापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर तिला मृत घोषित केले.

नमूद फिर्याद प्रमाणे, आत्महत्येबाबत कोणावरही संशय व्यक्त करण्यात आलेला नाही. या प्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात कलम १९४ बीएनएसएस अन्वये आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल सचिन पाटील करीत आहेत.

# जळगावच्या सफेद मुसळीची कम्बोडियाला पहिली निर्यात

## वनौषधी शेतीसाठी निर्यातीचे नवे दालन खुले

प्रतिनिधी ३० जुलै

**जळगाव जामोद :** वनौषधी शेतीसाठी महत्त्वाचा टप्पा ठरत, जळगाव जामोद तालुक्यातील वडगाव पाटण येथील प्रगतशील शेतकरी रामचंद्र अर्जुन वाघ यांनी उत्पादित केलेल्या सफेद मुसळीची २७ जुलै रोज कम्बोडिया येथे निर्यात करण्यात आली. कृषी विज्ञान केंद्राच्या तांत्रिक मार्गदर्शनामुळे या भागातील सफेद मुसळी प्रथमच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहोचली असून, परिसरातील वनौषधी शेतीसाठी नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. रामचंद्र वाघ हे गेल्या अनेक वर्षांपासून वनौषधी पिकांचे उत्पादन, प्रक्रिया आणि विपणन करत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब व सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे त्यांनी सफेद मुसळीच्या उत्पादनात गुणवत्ता राखली. याच गुणवत्तेच्या जोरावर त्यांच्या उत्पादनाला कम्बोडिया च्या बाजार पेठेत प्रवेश मिळाला.

**प्रथमच थेट परदेशात निर्यात**

जळगाव जामोद परिसरातील सफेद मुसळीची आतापर्यंत देशातील औषधनिर्मिती कंपन्यांकडून खरेदी होत होती; मात्र प्रक्रिया न केलेल्या मूळ स्वरूपातील सफेद मुसळीची थेट परदेशात निर्यात होण्याची ही पहिलीच घटना मानली जात आहे. त्यामुळे वनौषधी पिकांसाठी जागतिक बाजारपेठ उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला.

**२० टन निर्यातीचे लक्ष्य**

या यशानंतर आगामी वर्षात सुमारे २० टन सफेद मुसळी निर्यात करण्याचा मानस असल्याचे शेतकरी वाघ यांनी सांगितले. अधिकाधिक शेतकऱ्यांना वनौषधी शेतीशी जोडून निर्यातक्षम उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न आहे

**शेतीला नवी दिशा**

केव्हीकेचे प्रमुख डॉ. विकास जाधव यांनी सांगितले की, जळगाव जामोद आणि संग्रामपूर तालुक्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांना सफेद मुसळीसारख्या उच्च मूल्याच्या वनौषधी पिकांच्या उत्पादन व निर्यात प्रक्रियेशी जोडण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत

# नांदुरा रेल्वे स्थानकावरून बेपत्ता गर्भवती महिलेचा तांत्रिक तपासाच्या आधारे शोध

## लोहमार्ग पोलिसांनी सुखरूप पालकांच्या ताब्यात केले सुपूर्द

प्रतिनिधी ३० जुलै

**शेगाव :** लोहमार्ग पोलीस ठाणे, शेगाव येथे दाखल मनुष्य मिसिंग क्र. ०३/२०२६ मधील हरवलेली महिला वय २४ वर्ष हिचा अवघ्या काही दिवसांत तांत्रिक तपास, सोशल मीडियाचे विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे शोध घेण्यात लोहमार्ग पोलिसांना यश आले असून, तिला सुखरूप तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. दिनांक २०/०७/२०२६ रोजी सदर महिला तिच्या सासऱ्यांसमवेत अमरावती–सुरत एक्सप्रेसने शेगाव ते सुरत असा प्रवास करीत असताना नांदुरा रेल्वे स्थानकावर सासऱ्यांची नजर चुकवून रेल्वेतून उतरून निघून गेली होती. त्यानंतर तिचा कोणताही संपर्क होत नसल्याने लोहमार्ग पोलीस ठाणे, शेगाव येथे मनुष्य मिसिंग दाखल करून तातडीने शोधमोहीम सुरू करण्यात आली. तपासादरम्यान सदर महिला प्रथम देऊळगाव मही, जि. बुलढाणा येथे तिच्या मैत्रिणीकडे गेल्याचे निष्पन्न झाले. तेथून ती जालना रेल्वे स्थानकावरून नाशिक येथे गेली. स्वतःचा माग लागू नये म्हणून तिने जुने सिमकार्ड बंद करून नवीन सिमकार्ड घेतले तसेच अशोकनगर, सातपूर, नाशिक येथे भाड्याने खोली घेऊन एका मॉलमध्ये काम करीत असल्याची माहिती तपासात पुढे आली. सदर महिला गर्भवती असल्यामुळे तिचा तात्काळ शोध घेणे अत्यंत आवश्यक होते. त्यानुसार पोलीस हवालदार ४६० गजानन मेटांगे यांनी महिलेच्या मोबाईलचे ष्टष्ठक्र, लोकेशन, ढ्ढठ्ठह्यह्लड्डद्दह्म्ड्ढ व इतर सोशल मीडिया खात्यांचे तांत्रिक विश्लेषण करून महत्त्वपूर्ण धागेदोरे मिळवले. त्याचबरोबर कॉल डिटेलमधून तिच्या एका मैत्रिणीचा मोबाईल क्रमांक प्राप्त करून तिच्याशी संपर्क साधण्यात आला.

सुरुवातीस संबंधित मैत्रिणीने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र तांत्रिक पुरावे, गोपनीय माहितीदारांकडून मिळालेली माहिती आणि सातत्यपूर्ण तपासाच्या आधारे सदर महिला अशोकनगर, सातपूर, नाशिक येथे वास्तव्यास असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक २८/०७/२०२६ रोजी पोलीस हवालदार ४६० गजानन मेटांगे, पोलीस हवालदार ३७९ राम मोहेकर यांनी नाशिक येथे जाऊन सदर महिलेचा शोध घेऊन तिला सातपूर पोलीस ठाणे, नाशिक येथे आणले. चौकशीदरम्यान तिने कौटुंबिक कारणांमुळे तसेच आई-वडील रागावतील या भीतीमुळे घरातून निघून गेल्याचे सांगितले. त्यानंतर सातपूर पोलीस ठाणे येथे तिची तिच्या आईसोबत भेट घडवून आणण्यात आली.



अनेक दिवसांनंतर झालेल्या या भेटीत आई व मुलीने एकमेकींना घट्ट मिठी मारत अश्रूंनी भावना व्यक्त केल्या. उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्याही डोळ्यांत हा प्रसंग पाहून आनंदाश्रू तरळले.

आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सदर महिलेस तिच्या आईच्या ताब्यात सुखरूप सुपूर्द करण्यात आले. या यशस्वी कार्यवाहीबद्दल महिलेच्या पालकांनी लोहमार्ग पोलीस ठाणे, शेगाव येथील पोलीस अधिकारी व अंमलदारांचे मनःपूर्वक आभार मानले.

**प्रभारी अधिकारी श्री. विवेकानंद राळेभात यांचा संदेश**

"आजच्या धावपळीच्या जीवनात घरातील छोट्या-छोट्या मतभेदांचे रूपांतर अनेकदा गंभीर परिस्थितीत होते. पालकांचे रागावणे हे मुलांच्या हितासाठी असते, तर मुलांनीही क्षणिक राग, गैरसमज किंवा भीतीपोटी घर सोडण्याचा निर्णय घेऊ नये. अशा एका निर्णयामुळे संपूर्ण कुटुंब मानसिक वेदना, असुरक्षितता आणि चिंतेत सापडते. कोणतीही समस्या संवादाने सोडवता येते. त्यामुळे पालक आणि मुलांनी एकमेकांशी मोकळेपणाने संवाद साधावा, एकमेकांच्या भावना समजून घ्याव्यात आणि रागाच्या भरात टोकाचे निर्णय घेणे टाळावे. प्रत्येक कुटुंबातील संवाद हा नातेसंबंध टिकविण्याचा सर्वात मोठा आधार आहे.

एक क्षणाचा राग आयुष्यभराचे दुःख ठरू शकतो; परंतु एक प्रेमळ संवाद संपूर्ण कुटुंबाला पुन्हा एकत्र आणू शकतो.'" सदर उल्लेखनीय कार्यवाही पोलीस अधीक्षक, लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर श्री. संदीप पालवे , उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग मनमाड श्री. वसंत भोये तथा प्रभारी अधिकारी, लोहमार्ग पोलीस ठाणे, शेगाव श्री. विवेकानंद राळेभात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार ४६० गजानन मेटांगे, पोलीस हवालदार ३७९ राम मोहेंकार व पोलीस हवालदार ५२२ किरण आघाव यांनी तांत्रिक तपास, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या बळावर यशस्वीरित्या पार पाडली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड ८
गुरूवार, दि.३० जुलै २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com

# नवीन गॅस कनेक्शन ऐवजी गरजूंना घ्यावे लागत आहे छोटू सिलेंडर

## दुधाची तहान ताकावर भागवणे सुरु



प्रतिनिधी ३० जुलै

अकोला : अमेरिका इराण युद्ध सुरू झाल्यापासून नवीन गॅस कनेक्शन व वितरण यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. सध्या कमर्शियल सिलेंडर वरील निर्बंध उठवण्यात आले आहेत. परंतु नवीन घरगुती गॅस कनेक्शन देण्याची प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नसून, सध्या केवळ नोंदणी करून घेतली जात आहे. कनेक्शन कधी सुरू होणार याबाबत गॅस कंपन्यांकडून अद्याप कोणतेही स्पष्ट निर्देश प्राप्त झाले नसल्याची माहिती गॅस वितरकांकडून दिली जात आहे. त्यामुळे घरगुती एलपीजी गॅसचे नवीन कनेक्शन घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना अद्याप प्रतीक्षा करावी लागत आहे.नवीन कनेक्शन मिळत नाही मात्र, नोंदणी करण्याची सुविधा सुद्धा मिळत नाही



### अत्यावश्यक गरज असेल तर छोटू घ्या..!

अत्यावश्यक गरज असलेल्या ग्राहकांना तात्पुरता पर्याय म्हणून पाच किलो क्षमतेचा 'छोटू' एलपीजी सिलिंडर उपलब्ध करून दिला जात आहे. हा सिलिंडर आधार क्रमांकाच्या आधारे विकत घेता येतो. तसेच ज्या गॅस एजन्सीकडून तो घेतला असेल, तेथेच त्याचे रिफिलिंगही करून मिळते.

### विद्यार्थी, स्थलांतरित कुटुंबाची होत आहे परवड

गॅस एजन्सीच्या माहितीनुसार, नवीन गावात वास्तव्य करणारे किंवा स्थलांतर करणारे, तसेच बाहेर जाऊन येणारे विद्यार्थी, घरातून वेगळे झालेले अशांना नवीन सिलेंडर मिळत नसल्याने त्यांना नवीन गॅस कनेक्शन साठी प्रतीक्षा करावी लागत आहे. ज्याप्रमाणे कमर्शियल गॅस सिलेंडर वरची बंदी उठवण्यात आली आहे त्याचप्रमाणे नवीन गॅस सिलेंडरची नोंदणी सुद्धा त्वरित सुरू करण्यात यावी अशी मागणी ज्यांच्याकडे नवीन गॅस कनेक्शन नाही असे नागरिक करीत आहेत

### पुढील निर्देशानंतरच दिले जाईल नवीन कनेक्शन

गॅस कंपन्यांच्या पुढील निर्देशांनंतरच नवीन कनेक्शन देण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू होऊ शकते. सध्या केवळ ग्राहकांची नोंदणी करून त्यांची माहिती घेतली जात आहे. ज्यांना आवश्यकता असल्यास छोटू सिलेंडर दिले जात आहे

**शहरातील एक गॅस एजन्सी व्यवस्थापक**


नवीन कनेक्शन साठी आधार कार्ड, पासबुक, रहिवासी पुरावा म्हणून वीज किंवा आधार क्रमांक ग्राहकाचे आकारातील पासपोर्ट छायाचित्र सादर करणे आवश्यक आहे मात्र सर्व कागदपत्रे असल्यावर सुद्धा नोंदणी होत नसल्याने नवीन गॅस कनेक्शन घेणारे सैरभैर झाले आहेत. नवीन कनेक्शन कधी मिळणार, याबाबत कोणतीही निश्चितता नसल्याने ग्राहक संभ्रमात आहेत. कंपन्यां कडून निर्देश येताच कळवू, असे एजन्सी तर्फे सांगण्यात येत आहे


## घराच्या वादातून दोन गटांत हाणामारी

**खामगाव :** शहरातील बोरीपुरा परिसरात घराच्या मालकी व राहणीच्या वादातून दोन कुटुंबांमध्ये हाणामारी झाल्याची घटना २९ जुलै रोजी सकाळी सुमारे १० ते १०:३० वाजताच्या दरम्यान घडली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पहिल्या प्रकरणात मुक्तार खान हाजी इस्माईल खान पिंजारी (वय ५७, रा. बोरीपुरा) यांच्या फिर्यादीवरून रूस्काना बी शेख अन्सार, शेख अन्सार शेख मेहबूब, शेख तौसीफ शेख अन्सार आणि शेख शाहरूख शेख अन्सार (सर्व रा. बोरीपुरा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, याच घटनेप्रकरणी रुस्काना बी शेख अन्सार (वय ४५) यांनी मुक्तार खान हाजी इस्माईल खान पिंजारी, नसीम बी मुक्तार खान, अरबाज खान मुक्तार खान, अझर खान मुक्तार खान (सर्व रा. बोरीपुरा) तसेच फिरोज खान, सलमान खान आणि अरबाज खान (रा. बाळापूर, जि. अकोला) यांच्याविरुद्धही फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, आईला भेटण्यासाठी गेल्यानंतर वाद निर्माण झाला आणि त्यानंतर संबंधितांनी काठ्या व दगडांनी मारहाण केली.

# हरिनाम गोड झाले...!

## दहिहांडी व गोपाळकाला उत्सवाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता....





प्रतिनिधी ३० जुलै

अकोला : जुन्या शहरातील ३२२ वर्षे प्राचीन श्री विठ्ठल मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला. २२ जुलैपासून सुरू झालेल्या या सप्ताहाची गुरुवारी (३० जुलै) गोपाळकाला व दहिहांडी उत्सवाने उत्साहपूर्ण वातावरणात सांगता करण्यात आली.

सप्ताहादरम्यान अखंड हरिपाठ, विविध भजन मंडळांचे सुमधुर भजन, हरिनाम संकीर्तन तसेच कीर्तन सेवा यांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील ३५ हून अधिक भजन मंडळांनी सप्ताहभर भजन व अखंड नामस्मरण करून श्री विठ्ठल चरणी भक्तीसेवा अर्पण केली.



संपूर्ण सप्ताहात मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून हरिनाम, भजन व कीर्तनाचा लाभ घेतला. समारोपाच्या दिवशी गोपाळकाला व दहिहांडी उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

अखंड हरिनाम सप्ताह यशस्वी करण्यासाठी सर्वसेवाधिकारी कृष्णा गोवर्धन शर्मा, व्यवस्थापक रमेश अलकरी, श्याम घाटे, सचिन मुदिराज, आनंद उगले, विकास वाणी, प्रवीण वाणी, प्रमोद अलकरी, महेश कडुस्कर, बबलू ठाकूर, नितीन खोत, विवेक भौरदकर, श्याम बंकुवाले, यशोधन गोळबोळे यांच्यासह सर्व सेवाधिकारी व भाविकांनी परिश्रम घेतले.

## घरात अडकलेल्या नील गायीच्या सुटकेसाठी वन विभागाचे रेस्क्यू ऑपरेशन

प्रतिनिधी ३० जुलै

**अकोला:**वाशिम बायपासवरील गंगानगर मध्ये एक जंगली नीलगाय अचानक एका घरात शिरल्याने एकच गोंधळ उडाला होता. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना त्या नीलगायीला मोठ्या प्रयत्नाने बाहेर काढले. गंगानगर परिसरातील शेतामध्ये नीलगाय आणि हरणांचे कळप अनेकदा दिसतात. कळपापासून वेगळी झालेली एक नीलगाय



गंगानगर परिसरात आली असता तेथील श्वानांनी तिचा पाठलाग केला, तेव्हा घाबरलेली नीलगाय सैरावैरा पळाली, ज्यामुळे तिला गंभीर दुखापत झाली आणि तिच्या तोंडातून रक्तस्त्राव होऊ लागला. घाबरलेली नीलगाय एका घरात शिरली, जिथे



तिचा पाय बोअरवेलच्या मोटर पंपाजवळ अडकला होता. या घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली. माहिती मिळताच, वनविभागाचे एक पथक घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले.

## हेल्मेट घालून आल्यावर जनतेची कामे होणार का ?

### जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्मेटशिवाय प्रवेश नाही



प्रतिनिधी ३० जुलै

**अकोला :** अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात १ ऑगस्टपासून हेल्मेटशिवाय दुचाकीस्वारांना प्रवेश दिला जाणार नसल्याची माहिती समोर आली आहे. रस्ते सुरक्षा आणि वाहतूक नियमांचे पालन व्हावे, या उद्देशाने जिल्हा प्रशासनाने ही सक्ती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. पण, हेल्मेट घालणाऱ्यांचे कामे थांबणार नाही याची ग्वाही जिल्हा प्रशासन देणार का अशी विचारणा होणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षकांकडून हेल्मेटची तपासणी केली जाणार असून, हेल्मेट नसलेल्या दुचाकीस्वारांना कार्यालयाच्या आवारात प्रवेश नाकारला जाऊ शकतो. त्यामुळे शासकीय कामानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांनी हेल्मेट घालूनच येण्याचे आवाहन करण्यात येत आहे. दरम्यान, या निर्णयामुळे रस्ते सुरक्षा नियमांचे पालन करण्यास चालना मिळेल, अशी अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली आहे. मात्र, तातडीच्या शासकीय कामासाठी येणाऱ्या नागरिकांना यामुळे अडचणी निर्माण होणार नाहीत ना, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. या निर्णयाबाबत प्रशासनाने अधिकृत आदेश, अंमलबजावणीची पद्धत आणि हेल्मेट नसलेल्या नागरिकांबाबत कोणती कार्यवाही केली जाणार याबाबत स्पष्टता देणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## रेन वॉटर हार्वेस्टिंगद्वारे जलपुनर्भरणावर भर द्यावा : महापौर

प्रतिनिधी ३० जुलै

**अकोला:** शहरात होत असलेल्या विकासात्मक कामांमुळे मुख्य रस्ते, सर्व्हिस गल्ली आणि मोहोल्यात सर्वत्र सिमेंट काँक्रीटचे रस्ते बनले आहेत.

परिणामी, जमिनीमध्ये पावसाचे पाणी मुरण्याचे प्रमाण नगण्य झाले असून भूजल पातळी दिवसेंदिवस खालावत चालली आहे. भविष्यात उद्भवणारी संभाव्य पाणीटंचाईचे संकट लक्षात घेता, भूजल पातळी वाढविणे आणि पाण्याचा अपव्यय टाळणे ही काळाची गरज बनली आहे. या गंभीर प्रश्नावर मात करण्यासाठी शहरातील प्रत्येक नागरिकाने आपल्या घरात, संस्था,



व्यावसायिक आस्थापना तसेच शासकीय व निमशासकीय इमारतींमध्ये 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' प्रणाली उभारावी, असे आवाहन महापौर सौ. शारदा रणजित खेडकर यांनी केले आहे.

महापौर सौ.खेडकर यांनी सांगितले की, पावसाचे पाणी थेट नाल्यांमध्ये वाहून जाण्याऐवजी ते जमिनीत मुरविल्यास भूजल पातळी वाढण्यास मदत होते. यामुळे विहिरी, बोअरवेल आणि इतर जलस्रोतांना पुनर्भरण मिळून भविष्यातील पाण्याची उपलब्धता सुधारण्यास हातभार लागतो. हवामानातील बदल आणि वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याचे नियोजन ही काळाची गरज बनली असून रेन वॉटर हार्वेस्टिंग हा त्यासाठी प्रभावी आणि पर्यावरणपूरक उपाय आहे. तरी शहरातील सर्व शासकीय, प्रशासकीय इमारती, संकुले, शैक्षणिक संस्था, उद्योग, व्यापारी प्रतिष्ठाने तसेच मोठ्या इमारतींनी जलपुनर्भरणाची व्यवस्था करावी. तसेच नव्याने उभारण्यात येणाऱ्या इमारतींमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रणालीचा समावेश करण्यास प्राधान्य द्यावे. "प्रत्येक थेंब वाचवा, भविष्यासाठी पाणी साठवा" हा संदेश प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

## महामार्गावरील अंडरपास उतारावर विजेचा खांब धोकादायक



प्रतिनिधी ३० जुलै

**अकोला :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 53 वरील खडकीजवळील अंडरपासच्या उतरणाऱ्या रस्त्याच्या मध्यभागी उभा असलेला विजेचा खांब वाहनचालकांसाठी मोठा धोका बनला आहे. या मार्गावरून दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहने ये-जा करतात. मात्र रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या खांबामुळे वाहनचालकांना अचानक वळसा घ्यावा लागत असून अपघाताची शक्यता वाढली आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात कमी दृश्यमानतेमुळे हा खांब सहज लक्षात येत नाही. त्यामुळे अनेक वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. यापूर्वी किरकोळ अपघातही झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. महामार्गाचे रुंदीकरण आणि अंडरपासचे काम पूर्ण झाल्यानंतरही संबंधित विजेचा खांब हलविण्यात आलेला नाही. त्यामुळे सार्वजनिक सुरक्षेकडे संबंधित यंत्रणांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे.

स्थानिक ग्रामस्थांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि महावितरण प्रशासनाने तातडीने पाहणी करून रस्त्याच्या मध्यभागी असलेला विजेचा खांब स्थलांतरित करावा, अशी मागणी केली आहे. मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने त्वरित उपाययोजना करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## स्काऊट गाईड उजळणी वर्ग

**अकोला :** जिल्हा परिषद शिक्षण विभाग आणि भारत स्काऊट अँड गाइड्स जिल्हा कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय स्काऊट-गाइड उजळणी वर्ग व बिगिनर्स कोर्सचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या धोरणानुसार शाळांमध्ये स्काऊट-गाइड उपक्रम राबवणे व युनिट नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले.

## भारत कृषक समाज महाराष्ट्र तर्फे राज्यभर 1 ऑगस्ट पासुन वृक्ष लागवड मोहिम

प्रतिनिधी ३० जुलै

**अकोला:** दरवर्षी शहरीकरणामुळे, औद्योगिकरणामुळे, हायवे रोडमुळे वगैरे मोठ्या प्रमाणांत झाडांची कत्तल होत असते. परंतु झाडे लागवडीचे प्रमाण त्या मानाने फार कमी आहे.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या वृक्षांची गरज असते, भारत कृषक समाज महाराष्ट्र तर्फे दरवर्षी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राज्यभर वेगवेगळया जिल्हयात चेअरमन डॉ. प्रकाश मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असतो.

यावर्षी सुध्दा १ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑगस्ट २०२६ दरम्यान अकोला, अमरावती, वाशिम, बुलढाणा, नागपुर, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, जळगांव खांदेश, धुळे, नंदुरबार, छत्रपती संभाजी नगर, नासिक, सातारा, पुणे इत्यादी जिल्हयामध्ये वृक्षरोपणाचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. कडु निंबाचे साधारण ५, ६ फुट उंचीचे झाडे लावण्यात येतात. झाडे अशा ठिकाणी लावण्यात येतात जिथे त्यांची काळजी घेण्यात येते आणि ती झाडे जगण्यावर भर देण्यात येतो.

## आता एक सप्टेंबर पर्यंत काढता येईल एनसीएमसी कार्ड


### नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी महामंडळाचा निर्णय

प्रतिनिधी ३० जुलै

**अकोला :** एस. टी. प्रवासात शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी 'एनसीएमसी' स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला आता १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप एनसीएमसी स्मार्ट कार्ड प्राप्त झाले नसल्याने त्यांची गैरसोय होऊ नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील अनेक पात्र प्रवाशांनी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असली तरी काही ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप प्रत्यक्ष



कार्ड मिळालेले नाही. त्यामुळे केवळ कार्ड उपलब्ध न झाल्याने पात्र प्रवाशांना शासनाच्या सवलतीपासून वंचित राहावे लागू नये, याची दखल परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेत स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या अंमलबजावणीला आता दि. १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती महामंडळाने प्रसिद्ध केली आहे. दरम्यान, पात्र प्रवाशांनी या वाढीव मुदतीचा उपयोग करून कार्डची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे एस. टी. महामंडळाने म्हटले आहे.




### एक सप्टेंबर पर्यंत वाढवली मुदत

राज्य शासनाच्या वतीने अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, ज्येष्ठ नागरिकांना तसेच महिलांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत देण्यात येते. या सवलती अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी १ ऑगस्टपासून एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

## आरटीई प्रवेशासाठी उद्या अखेरचा दिवस

प्रतिनिधी ३० जुलै

**अकोला :** आरटीई अर्थात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत खासगी विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये राखीव २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत चौथ्या प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना मुदतवाढीमुळे दिलासा मिळाला आहे. चौथ्या प्रतीक्षा यादीतील २२ विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठीची मुदत २४ जुलैपर्यंत होती. मात्र, शिक्षण विभागाने ही मुदत वाढवून ३१ जुलैपर्यंत प्रवेश निश्चित करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

## कोरड्या विहिरीत पडलेल्या महिलेला मानव सेवा फाऊंडेशनच्या जवानांनी सुखरुप बाहेर काढले

प्रतिनिधी ३० जुलै

**अकोला:** मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाऊंडेशन संचालित संत गाडगे बाबा आपात्कालीन शोध व बचाव पथक पिंजर शाखा मंगरूळपीरच्या जवानांनी महीलेला जीवनदान. सोनखास शेतशिवारात मानोली रोड विट भट्टी जवळ 29 जुलै रोजी दुपारी एक महिला कोरड्या विहिरीत पडली होती. गाडगे बाबा आपात्कालीन शोध व बचाव पथकाने तिला बाहेर काढले.

मंगरूळपीरचे ठाणेदार किशोर शेळके यांनी संत गाडगेबाबा आपात्कालीन शोध व बचाव



पथकाचे प्रमुख दीपक सदाफळे यांना माहिती दिली. तेव्हा रेस्क्यू टिमचे गोपाल गीरे,गोपाल जयस्वाल,दत्ता मानेकर यांना शोध व साहित्यासह रवाना झाले. विहीर चाळीस फुट खोल आणि कोरडी असुन त्यात महिला पडलेली दिसली. पथकाचा जवान गोपाल गीरे हा वायर रोपच्या सहाय्याने खाली उतरला आणी महिलेला धिर देऊन हेल्मेट घालून दिले. आणि खाटेच्या सहाय्याने त्या महिलेला सायंकाळी जीवंत सुखरुप बाहेर काढून पोलीसांचे ताब्यात दिले. घटनास्थळावर उपस्थित मंगरूळपीर ठाण्याचे किशोर शेळके,पो.कॉ.प्रमोद थोरवे, धनंजय पवार गावातील नागरीक तसेच नातेवाईक हजर होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135